नगरसचिव
विषय क्र. २१६३ ते ---
ठराव क्र. ------

## पुणे महानगरपालिका
### स्थायी समिती (खास सभा)
### कार्यपत्रिका क्र.४६, दि.२५/१/२०१६
### सभा क्र.६५,दि.२५/१/२०१६ चा वृत्तांत

स्थायी समितीची, पुणे मनपा अंदाजपत्रक सन २०१६-१७ विशेष (खास) सभा सोमवार, दिनांक २५/१/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात भरली होती.

सदर सभेस खालील मा.सभासद उपस्थित होते.

१. मा. सौ.कदम अश्विनी नितिन – अध्यक्षा
२. मा. अलगुडे मुकारी आण्णा

३. मा.सौ.आंदेकर राजश्री सुर्यकांत
४. मा.सौ.ओरसे शारदा शंकर
५. मा.कर्णे (गुरूजी) बापूराव गंगाराम
६. मा.ॲड.कदम रामचंद्र ऊर्फ चंदुशेठ आत्माराम
७. मा.केमसे शंकर दत्तात्रय, सभागृहनेते
८. मा.सौ.ओसवाल दिपाली प्रमोद
९. मा.जगताप बाळा ऊर्फ श्रीकांत शशिकांत
१०. मा. सौ.टिळक मुक्ता शैलेश
११. मा.तुपेरे राहूल बापू
१२. मा.बागवे अविनाश रमेश
१३. मा.सौ.बाबर आरती साईनाथ
१४. मा. राणे अनिल बाबूराव
१५. मा.सौ.लोणकर नंदा नारायण
१६. मा.शिळीमकर राजेंद्र यशवंत

खालील निमंत्रित इतर मा.सभासद निमंत्रणावरुन उपस्थित होते.
मा.दत्तात्रय धनकवडे, महापौर, मा.अरविंद शिंदे,विरोधी पक्षनेते मा.राजेंद्र वागस्कर, गटनेते मनसे. मा.गणेश बिडकर, भा.प.जा.नेते

व इतर सर्व मा.सभासद उपस्थित होते.

लघुलेखक :-
सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

१. मा. कुणाल कुमार , महापालिका आयुक्त
२. मा. ,अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.)
३. मा. ओमप्रकाश बकोरिया,अति. महा. आयुक्त (वि.)
४. मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)
५. मा.अभिषेक कृष्णा, अध्यक्ष व व्यव. संचालक,पीएमपीएमएल
६. श्री.सुनिल पारखी, नगरसचिव
७. मा.हनुमंत नाझीरकर, प्र.संचालक(ना.वि.यो.)
८. मा.अंबरिष गालिंदे,सह आयुक्त (लेखापरिक्षक)
९. मा. सुहास मापारी,(कआ. व क.सं. प्रमुख)
१०. मा.अनिल पवार, उपायुक्त (विशेष)
११. मा.नितिन उदास, उपायुक्त (ग.व.नि.)
१२. मा.प्रकाश बोरसे, उपायुक्त (जिं.घ.)
१३. मा.मंगेश जोशी, उपायुक्त (जनरल)(सेवकवर्ग)
१४. मा.विजय दहीभाते, उपायुक्त (तांत्रिक)
१५. मा.डॉ.एस.टी.परदेशी, प्र.आरोग्यप्रमुख
१६. मा.सौ.उल्का कळस्कर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१७. मा. विलास कानडे, उपायुक्त स्थानिक संस्था कर
१८. मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता
१९. मा.राजेंद्र राऊत, अति.नगर अभियंता (पथ) व (जनेयो क्र.१ )
२०. मा. सौ. मिनाक्षी राऊत,शिक्षणाधिकारी, माध्य.व तां.शि.
२१. मा. दहीफळे बबन, शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ
२२. मा.थोरात, प्र.मुख्य विधी अधिकारी
२३. मा.माधव जगताप, प्र.उपायुक्त अतिक्रमण
२४. मा.घोरपडे, सहा.उद्यान अधिक्षक
२५. मा. , उपायुक्त (समाजकल्याण)
२६. मा.श्रीनिवास बोनाला,अति.नगर अभियंता (प्रकल्प व वाहतूक नियोजन व जनेयो क्र.२)
२७. मा.प्रशांत रणपिसे, मुख्य अग्निशामक अधिकारी
२८. मा.शिवाजी दौंडकर, मुख्य कामगार अधिकारी
२९. मा.सुनिल केसरी, उपायुक्त (वि.का.१)
३०. मा.ज्ञानेश्वर मोळक, उपायुक्त (वि.का.२)
३१. मा.मधुकांत गरड, उपायुक्त (वि.का.३)
३२. मा.सुरेश जगताप, उपायुक्त (वि.का.४)
३३. मा.किशोरी गद्रे, उपायुक्त (वि.का. घनकचरा व्यवस्थापन)
३४. मा.सतिश कुलकर्णी, उप आयुक्त (भु.जि.)
३५. मा.राजेंद्र राऊत अधी.अभियंता (पथ)
३६. मा.श्रीनिवास कंदूल, अधीक्षक अभियंता (विद्युत)
३७. मा.श्रीकृष्ण चौधरी, कार्यकारी अभियंता (विद्युत)
३८. मा.ना.न.बारापात्रे, विकास अभियंता, (पथ)
३९. मा.किशोर पोळ, कार्यकारी अभियंता(व्हे.डेपो.)
४०. मा.विजय कुलकर्णी,अधी.अभि.(ड्रेनेज व पा.पु.प्रकल्प)
४१. मा.संतोष पवार, सुरक्षा अधिकारी
४२. मा.शाम ढवळे, अधीक्षक अभियंता (हरिटेज)
४३. मा.संजय मोरे, जनता संपर्क अधिकारी
४४. मा.डॉ.उदय टेकाळे, वि. कार्या.(दक्षता) (सांख्यिकी व संगणक)
४५. मा.किशोर पोळ, कार्यकारी अभियंता (व्हे.डेपो)
४६. मा.प्रदीप बेलदार,कार्य.अभि.(ड्रे)
४७. मा. राहूल जगताप, सांख्यिकी व संगणकप्रमुख
४८. मा.मंगेश दिघे, पर्यावरण अधीक्षक
४९. मा.भोसेकर, प्र.उपायुक्त, सुरक्षा रक्षकप्रमुख
५०. मा.धारूरकर, (पी.एम.पी.एम.एल.)

# पुणे महानगरपालिका
## स्थायी समिती (खास सभा)
## कार्यपत्रिका क्र.४६, दि.२५/१/२०१६
## सभा क्र.६५, दि.२५/१/२०१६ चा वृत्तांत

मा.अध्यक्षा–सभा सुरू करावी.
नगरसचिव–सभेला सुरूवात करण्यात येत आहे.

<u>कार्यपत्रिकेवरील विषय</u>

**विषय क्र.२१६३/ठराव क्र.**

सन २०१६–१७ भांडवली व महसूली, उत्पन्न व खर्चाचे ‘अ’ व ‘क’ अंदाजपत्रकाचा आराखडा सादर करणेबाबत.

नगरसचिव– मी मा.महापालिका आयुक्त साहेबांना विनंती करतो की, त्यांनी मा.स्थायी समितीकडे अंदाजपत्रकाचा आराखडा सादर करावा.
(यावेळी मा.महा.आयुक्त साहेबांनी सन २०१६–१७ च्या अंदाजपत्रकाचा आराखडा मा.स्थायी समितीकडे सादर केला)
**मा.महा.आयुक्त**–मा.महापौर महोदय, मा.अध्यक्षा, स्थायी समिती, मा.सभागृहनेते, मा.पक्षनेते,म.न.से., मा.पक्षनेते, भाजपा.,उपस्थित सर्व सन्माननीय स्थायी समितीचे सदस्य, उपस्थित सर्व सन्माननीय सभासद, उपस्थित सर्व पत्रकार बंधू, नागरीक, उपस्थित माझे सर्व सहकारी, अधिकारी, कर्मचारी, बंधू आणि भगिनींनो, आज मला सन २०१६–१७ चे प्रस्तावित अंदाजपत्रक आपल्यासमोर सादर करताना विशेष आनंद होतो आहे. या अंदाजपत्रकाच्या निवेदनाची प्रत आपल्याकडे देण्यात येत आहे. या सादरीकरणाच्या माध्यमाने, या अंदाजपत्रकातील ठळक बाबींचा उल्लेख, मी आपल्यासमोर करणार आहे.

आपण सर्वांना आपल्या शहराबद्दल अभिमान आहे. आपले शहर हे देशातील अत्यंत प्रगतीशील असलेले असे शहर आहे. अनेक काही घडामोडीबद्दल, शहरी विकास या क्षेत्रामध्ये होणाऱ्या विकासाच्या कामांबद्दल पूर्ण भारतामध्ये पुण्याकडे पाहिले जाते. आपले शहर देशातील ८ वे, सर्वात मोठे शहर आहे. पुणे शहर हे विद्येचे माहेर घर असून त्यास Oxford of the East म्हणून संबोधिले जाते. देशातील विदेशातील अनेक स्टुंडस आपल्या शहरामध्ये शिक्षणासाठी येतात आर्थिक सुबत्तेमध्ये सुध्दा आपले शहर भारतामध्ये अग्रगण्य आहे. जी.डी.पी.पर कॅपिटलचे मानक पाहिले तर आपले शहर देशामध्ये ५ व्या क्रमांकावर आहे आणि मागच्या १० वर्षामध्ये आर्थिक सुबत्तेमध्ये सर्वात जास्त वाढ झालेले शहर, महाराष्ट्राच्या एकूण उत्पन्नामध्ये पुण्याचा ११ टक्के सहभाग आहे. त्यामुळे आपल्या शहराचा विकास आणि आपल्या शहरामध्ये गुणवत्ता आणि आर्थिक विकास एकंदरीत राज्यासाठी अत्यंत महत्वाचा आहे. आपले शहर वाढणारे शहर आहे, आपल्या शहरामध्ये इनव्हेस्टमेंटस येत आहेत. नवनवीन उद्योग येत आहेत. अशा परिस्थितीमध्ये लोकसंख्या वाढ होणे स्वाभाविक आहे. लोकसंख्या वाढीचे जे मॉडेल्स आहेत त्याचा जर विचार केला तर २०३० पर्यंत साधारणत: ५० ते ५२ लाख इतकी लोकसंख्या आपल्या शहराची होईल, असा अंदाज आहे. आपल्या शहराने आता स्मार्टसिटीकडे वाटचाल सुरू केलेली आहे आणि त्यामुळे आपल्या शहरामध्ये लोकांच्या अपेक्षा नागरीकांचा सहभाग आणि आपल्या शहराच्या भविष्याची जी संकल्पना आहे. ती अत्यंत एक चांगले शहर, भारतातील सर्वात चांगले जीवनमान असलेले शहर निर्मित करावयाचे आहे. त्यासाठी आता आपल्या शहराने वाटचाल सुरू केलेली आहे. अंदाजपत्रकावर चर्चा करताना, ही पार्श्वभूमी आपल्या लक्षात आणणे आवश्यक आहे. कारण ह्या अपेक्षांना, ह्या दिशेला आपल्याला पुढे जायचे आहे आणि या दिशेमध्ये आपले जे गोल्स आहेत ते साध्य करण्याकरीता आपले अंदाजपत्रक सार्थक ठरायला पाहिजे.

अंदाजपत्रक तयार करताना आपण जर मूळ तत्वे बघितली तर, पहिले तत्व, आर्थिक, सामाजिक, राजकीय, विकास, व समतेचे साधन, असे असायला पाहिजे, असे आपले अंदाजपत्रक झाले पाहिजे. क्षेत्रिय समतोल विकास, पूर्ण शहराचा विकास, प्रत्येक घटकाचा विकास या अंदाजपत्रकाच्या माध्यमाने शक्य झाले पाहिजे. शहराच्या भविष्याच्या दिशेनुसार अंदाजपत्रक असायला पाहिजे. अंदाजपत्रक एका वर्षाचे नसते. ते एका वर्षाचे जरी असले तरी पुढील ५,१०,१५ वर्षात पुण्याची स्वप्ने आहेत ती पूर्ण करण्यासाठी ह्यावर्षी जी पावले उचलणे आवश्यक आहे, त्याचे प्रतिबिंब या अंदाजपत्रकामध्ये असायला पाहिजे. अंदाजपत्रक वास्तविक व संरचनात्मक दृष्टया परिपूर्ण असणे आवश्यक आहे. आपले बजेट वास्तावर आधारीत असले पाहिजे. आपण कुठलेही नियोजन करताना आपल्याकडे नागरीकांचे मत आणि सध्या असलेल्या परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. लेखा सिध्दांताचे पालन व परिणाम लक्षी असणे आवश्यक आहे. आपल्या बजेट मध्ये लेखा सिध्दांत अत्यंत महत्वाचे असतात कारण ते जर पाळले गेले नाही. तर बजेटची अंमलबजावणी योग्यरित्या करता येत नाही आणि एका शहरामध्ये होणारे अंदाजपत्रक त्याची दुसऱ्या शहराशी तुलना करता येत नाही. एका शहरातील कामांची दुसऱ्या शहराच्या कामाशी तुलना करता येत नाही. त्यामुळे लेखा सिध्दांताचे पालन होणे अत्यंत आवश्यक आहे. सर्वसामान्य नागरीकांना समजेल, असे सुलभ असणे आवश्यक आहे. अनेकदा बजेटची पुस्तिका एवढी जाड, एवढी कॉम्पीकेटेड असते की, आपण अधिकाऱ्यांना, पदाधिकाऱ्यांना, नगरसेवकांना आणि सर्व घटकांना सुध्दा अंदाजपत्रक समजून घेणे कधी कधी कठीण होत असते, असे असताना हे सर्व सामान्य नागरीकांना कळेल, असे बजेट पुस्तक असायला पाहिजे. आपण सगळयांच्या माहिती करीता आज आम्ही एक नवीन संकेत स्थळ सुध्दा सुरू करीत आहोत. या संकेत स्थळाचे नाव, Our Pune, Our Budget. in या संकेतस्थळावर हे बजेट, याचे सादरीकरण, याचे सर्व एक्सेल फाईल्स, प्रभागाच्या बजेटची संपूर्ण माहिती, पुणे शहराची माहिती, हे सगळे टाकणार आहोत. जेणेकरून नागरीक घरी बसून, आपआपल्या कार्यालयामध्ये बसून, ज्या ठिकाणी त्यांना शक्य होईल, त्याठिकाणी महापालिकेच्या

बजेटची संपूर्ण माहिती घेऊशकतील, हे संकेत स्थळ सध्या इंग्रजीत आहे आणि दि.३० जानेवारी पर्यंत मराठीत काम पूर्ण होणार आहे. त्यानंतर सुलभ आणि सोप्या पध्दतीने नागरीकांना बजेट प्राप्त करता येईल, त्यावर चर्चा करता येईल, त्याबद्दलची माहिती घेणे शक्य होणार आहे.

आजच्या व भविष्याच्या गरजांची सांगड घालणे, हे बजेट मध्ये अत्यंत महत्वाचे आहे. अनेक गोष्टी असतात ज्या आज महत्वाच्या असतात आणि अनेक गोष्टी असतात की, त्या उद्या महत्वाच्या असणार आहेत. सगळे पैसे जर आजच्या महत्वाच्या गोष्टींवर खर्च केले तर भविष्याचा विचार करता येत नाही आणि वाईजचा सुध्दा नियम लागू होतो. त्यामुळे बजेटमध्ये दोन्हींची सांगड घालणे महत्वाचे असते. सुयोग्य धोरण व निर्णयांची आवश्यकता असते, आपण बजेट करताना जर त्याच्या पाठीमागे चांगल्या धोरणांना जर पाठिंबा दिला नाही, त्याला सर्पोट दिला नाही तर ते अंदाजपत्रक नुसते कागदावर राहते त्यांची अंमलबजावणी करणे शक्य होत नाही. त्यामुळे बजेट मध्ये जे काही आकडे आहे, जे नियोजन आहे ते नियोजन साध्य करायला धोरणांची आणि निर्णयांची आवश्यकता असते. ते धोरण आणि निर्णय मंजूर करणे आवश्यक आहेत अन्यथा त्या बजेटची अंमलबजावणी पूर्णपणे होऊ शकत नाही.

थोडक्यात मागील तीन वर्षाच्या महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकाचा संक्षिप्त आढावा या स्लाईड मध्ये दिलेला आहे. आपण जर पाहिले की, डिसेंबर २०१२ अखेर एकंदरीत जमा बाजू जी होती ती २०१४ कोटी रू.इतकी होती. सन २०१३ मध्ये दुर्देवाने ती कमी होऊन २०७७ कोटी पर्यंत झाली. डिसेंबर २०१४ मध्ये ती यामध्ये थोडी वाढ झाली आपण २३०० कोटी पर्यंत गेलो. मात्र यावर्षी जवळपास ३० टक्के वाढ होऊन आपण २३०० कोटी पासून २९३३ कोटी रू.पर्यंत यावर्षी पोहचलो आहोत, आणि वर्ष अखेरपर्यंत ४ हजार कोटी पर्यंत जाण्याचा आपला मानस आहे. मागील तीन वर्षातील खर्चाचा संक्षिप्त अहवाल आपण जर बघितला तर डिसेंबर २०१२ मध्ये १५०० कोटी, डिसेंबर २०१३ पर्यंत १७३८ कोटी, डिसेंबर २०१४ पर्यंत १८१८ कोटी, आणि ह्यावर्षी डिसेंबर २०१५ पर्यंत १९१२ कोटी रू. इतका आपला खर्च झाला आहे. थोडक्यात, ह्यावर्षी जे विशेष प्रकल्प झाले त्याचा मी उल्लेख करतो.

पुणे महानगरपालिका मुख्य भवनाच्या विस्तारित इमारतीचे काम सुरू करण्यात आले असून, पुढील वर्षाच्या बजेट मध्ये याला पूर्ण करण्यासाठी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे.

धनकवडी सातारा रोड उड्डाणपूल – माहे जुलै २०१५ पर्यंत नागरीकांसाठी खुला केला. पंडीत नेहरू स्टेडीयम मधील सर्व कामे पूर्ण केली.मुंढवा जॅकवेल येथे ६.६ टी.एम.सी.पाणी पुर्नवापराचा प्रकल्प सुरू झाला. मे २०१५ मध्ये सोमेश्वरवाडी येथे कै. संजय महादेव निम्हण उद्यान सुरू करण्यात आले.

पुणे मनपाच्या कोंढवा कत्तलखान्याला अन्न व अन्न पदार्थ, सुअरेज वॉटर तसेच मांस व मांसजन्य पदार्थांचे तपासणीसाठी उभारलेल्या आपल्या प्रयोगशाळेला ISO:9001:2008 प्रमाणपत्र केंद्र शासनाचे NABL चे Accreditation मिळाल्यानंतर ही इनफक्ट भारतातील महानगरपालिकांमधील पहिली लॅब आहे की, ज्याला हे मानांकन प्राप्त झाले.

मनपाच्या १९ इमारतींच्या छतावर सोलर पॅनल उभे करून, अंदाजे १ मेगावॅट पर्यंत वीज निर्मिती करण्याचा प्रकल्प हाती घेण्याचा प्रस्ताव, मा.स्थायी समितीला सादर आहे. त्याची मंजूरी झाल्यानंतर ह्या वर्षाअखेर पर्यंत, आपल्याला आपल्या शहराला उदाहरण देता येईल, अशा प्रकारच्या मनपाच्या या प्रोजेक्ट मार्फत १ मॅगावॅट पर्यंत वीज, आपल्या छतावरच्या रूफ टॉप, फोटो वॉल टाईप सेलच्या माध्यमाने आपल्याला विकसीत करता येणार आहे. आपल्याला यावर्षी अपांरपारिक उर्जा क्षेत्रातील कामगिरीबद्दल असोसिएशन ऑफ रिन्युएबल एनर्जी (AREAS) यांचे तर्फे प्रशस्तीपत्र सुध्दा प्राप्त झाले आहे.

सर्वांना विदीतच आहे की, पुणे शहरामध्ये प्रचंड, उत्साह सहभाग आणि प्रतिसादामुळे आपल्या केंद्र शासनाच्या स्मार्टसिटी योजनेमध्ये निवड झाली आणि आता अंतिम मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर आहे. आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आज, उद्यामध्ये कधीही याच्या अंतिम निकालाची घोषणा होऊ शकते. त्याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

आता मी सेक्टवाईज आपल्याकडे चालू असलेल्या कामांची आणि उद्याच्या भविष्यातील नियोजनाचा उल्लेख करणार आहे. सर्वात प्रथम पाणीपुरवठा, आपल्या समोर पाणीपुरवठा क्षेत्रामध्ये काम करताना जी मानके असायला पाहिजेत याचा उल्लेख या स्लाईड मध्ये केला आहे. पाणीपुरवठा सरासरी, दरडोई किती असायला पाहिजे? पुण्यामध्ये सध्या १९४ हे ही आपण अनेक काही बाबी कमी करून सांगतो. वास्तविक बघितले तर यापेक्षा थोडे जास्तच आहे. आपण १९४ लिटर दरडोई पाणी देतो. शहरी भारतला १०४ लिटर दरडोईचे प्रमाण आहे आणि १५० लिटरचे मानक आहे. आपण याचा जर अभ्यास केला तर आजच्या घडीला सुध्दा उपलब्ध असलेले पाणी आपल्यासाठी पुरेसे आहे आणि २४ बाय ७ या योजनेमुळे दुष्काळाच्या अवस्थेमध्ये सुध्दा पाणी देता येईल. ही सध्या पुण्याची परिस्थिती आहे. परंतु यासाठी आपल्याला अस्तित्वात असलेल्या वितरण व्यवस्थेमध्ये मोठया प्रमाणामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. नळाव्दारे पाणीपुरवठा उपलब्ध होत असलेल्या घरांची टक्केवारी पुण्यामध्ये सुदैवाने ९४ टक्के आहे. शहरी भारतामध्ये ७१ टक्के आहे. आपल्याला १०० टक्केचा उच्चांक गाठणे आवश्यक आहे. आता हे करताना मागच्यावर्षी जे ठळक बाबी केल्या आहेत. वारजे मध्ये २०० दशलक्ष प्रतिदिन क्षमतेचा जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वित झालेला आहे. भामा आसखेड प्रकल्पाची एकंदरीत २५ टक्के कामे पूर्ण झाली आहेत, त्यात अनेक कामे मार्गी लागली आहेत, अनेक कामांमध्ये अडचणी सुध्दा आहेत. त्या दूर करण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. जेणेकरून ही योजना आपल्याला वेळेच्या आत पूर्ण करता येईल. तसेच खडकवासला धरण ते पर्वती जलकेंद्र दरम्यान टाकण्यात येत असलेल्या दाबनलिकेचे काम सुध्दा प्रगतीपथावर असून, ते सुध्दा काही दिवसात पूर्ण होण्याची शक्यता आहे.वडगाव बु.ला जलशुध्दीकरण केंद्र व रॉ वॉटर पंम्पिंग स्टेशन बांधण्याचे काम ७० टक्के पूर्ण झालेले आहे. समान पाणी वाटप योजना, अत्यंत महत्वाची योजना जी २०४७ पर्यंत पुणे शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी तयार करण्यात आलेली आहे. या २०४७ पर्यंतच्या गरजेनुसार तयार केलेली योजना,

याला यावर्षी मा.मुख्यसभेची मान्यता मिळाली आणि २८१८ कोटी रू., म्हणजे डिसेंबर २०१५ च्या गणनपत्रकानुसार याची किंमत आहे. या आराखड्याला मंजुरी मिळाल्यानंतर आता त्याबद्दल योजना कार्यान्वित करण्याची संपूर्ण पॉलिसी मा.स्थायी समितीला सादर करण्यात आलेली आहे आणि या बजेट मध्ये सुध्दा त्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. सन २०१६–१७ मध्ये पाणी पुरवठ्याला अत्यंत मोठ्या प्रमाणावर निधी देण्याचा, आम्ही प्रयत्न केला आहे. स्मार्टसिटी योजनेतंर्गत जेव्हा लोकांच्या भावना, लोकांची मते प्राप्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला त्यामध्ये वाहतूक आणि पाणी हे दोन सर्वांत जास्त उल्लेख केलेल्या समस्यापैकी होते. त्यामुळे या दोन सेक्टर्सला ह्यावर्षी अंदाजपत्रकामध्ये सुध्दा भरीव निधी आणि मोठा भर देण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे. त्यातील पाणीपुरवठ्यामध्ये आपण जर बघितले तर मागील वर्षीपेक्षा दोन पट जवळ ९६९ कोटी रू.चा निधी यावर्षी दिलेला आहे. आपण यावर्षी जे उद्देश ठरविले आहे ते या प्रमाणे आहे. पर्वतीला नवीन जलशुध्दीकरण करण्याकरीता जेवढे पैसे लागतात ते संपूर्ण पैसे यावर्षी धरलेले आहेत आणि जवळपास ७० कोटी रू.निधी देऊन यावर्षी ही योजना पूर्ण करण्याचा आमचा मानस आहे. तसेच पर्वती जलकेंद्र ते लष्कर जलकेंद्र दरम्यान टाकण्यात येणाऱ्या २२०० मि.मि. व्यासाच्या दाबनलिका टाकण्याचे जे काम आहे. ते आपण हाती घेणार आहोत. खडकवासला पासून पर्वती वॉटर ट्रींटमेंट प्लॅन्टपर्यंत बंद नळ योजना मे २०१६ पर्यंत कार्यान्वित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. वडगाव येथील १२५ दशलक्ष लिटर प्रतीदिन क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र सुध्दा मे २०१६ पर्यंत पूर्ण करण्यात येईल. समान पाणी वाटप योजना ज्याचा मी मागील स्लाईड मध्ये उल्लेख केला आहे. त्या योजनेच्या महत्वाच्या घटकांची कामे आपण ह्यावर्षी सुरू करण्याचा प्रयत्न करणार आहोत आणि ही योजना येत्या ५ वर्षामध्ये पूर्ण करून पुणे शहराला ५ वर्षानंतर २४ बाय ७ शुध्द पाणी नळावर मिळेल, या प्रकारचा प्रयत्न या माध्यमातून ह्यावर्षापासून आपण सुरू करणार आहोत. पाणीपट्टी थकबाकी वसूली, गळती कमी करण्यासाठीचे नियोजन या बजेट मध्ये करण्यात आलेले आहे आणि अनधिकृत नळजोडांवर सुध्दा यावर्षी कारवाई मोठ्या प्रमाणावर केली जाणार आहे. ज्यांचे आपण प्रतिबिंब, जे आपण महसूलामध्ये वाढ सुचविली आहे त्यामध्ये ती दिसायला मिळेल. समान पाणी वाटप योजनेबद्दल काही गोष्टी आपल्यासमोर ठेवत आहे. २०१६ ते २०२० या ५ वर्षामध्ये ही योजना पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे. ही योजना पूर्ण करण्याकरीता भरीव निधी आपल्याला लागणार आहे कारण २८१८ कोटी ही प्रोजेक्टची किंमत आहे. त्यातल्या त्यात जेव्हा ही योजना आपण ५ वर्षात पूर्ण करायला घेणार आहोत. या ५ वर्षामध्ये इंटरेस्ट ड्युरिंग कन्स्ट्रक्शन ही जी अमॉउन्ट असेल ती जवळपास ५०० कोटी रू.ने वाढेल आणि साधारणत: या पिरिएड मध्ये आपल्याला ३३०० कोटी खर्च करावा लागणार. हे खर्च करण्याकरीता तरतूद होणे आवश्यक आहे यासाठी पहिल्यांदा शहरी पाणी निधी, अर्बन वॉटर फंड स्थापन करण्याचा एक संकल्प या बजेट मध्ये सुचविण्यात आला आहे. या अर्बन वॉटर फंड मध्ये यावर्षी पाण्याच्या दरामध्ये जी वाढ सुचविली आहे. त्यातून येणारे पैसे डायरेक्टली अे–स्क्रो होतील अशा प्रकारची व्यवस्था केलेली आहे म्हणजे यावर्षी जी काही दरवाढ सुचविण्यात आली आहे. ते मनपाच्या सेवकांच्या पगारावर किंवा डिझेलवर किंवा इतर कुठल्याही बाबींवर खर्च न होता फक्त आणि फक्त महानगरपालिकेने तयार केलेल्या २४ बाय ७ योजना ज्यामध्ये पुणे शहराचे २०४७ पर्यंतचे नियोजन आहे. त्यावर खर्च केला जाईल. यासाठी स्वतंत्र अकौंटमध्ये हे वाढीव येणारे पैसे जाणार आहेत. त्या शिवाय योजनेसाठी लोन उभे करण्याचा मानस यावर्षी आहे. त्या लोनचे पैसे सुध्दा या अकौंट मध्ये जातील, असे मिळून या संपूर्ण पाणीपुरवठा योजनेसाठी अर्बन वॉटर फंड स्थापन करण्याचा उद्देश आणि त्याचे स्थापनेचे लक्ष ह्यावर्षी बजेट मध्ये प्रस्तावित केलेले आहे. जसे मी पूर्वी सांगितले २०४७ पर्यंत पुण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी ही योजना अत्यंत महत्वाची आहे आणि याला कुठलाही विलंब न करता सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे. संपूर्ण शहरात ५ वर्षात स्मार्ट पाणी मीटरची अंमलबजावणी आपल्याला करायची आहे. प्रत्येक घराला, प्रत्येक मालमत्तेमध्ये आपल्याला स्मार्ट वॉटर मीटर्स लावणे आवश्यक आहे. आपण जोपर्यंत वॉटरची मीटरींग सुरू करीत नाही, पाण्याची मीटरींग सुरू करीत नाही तोपर्यंत पाणी बचत आणि पाण्याचे महत्व सुध्दा अनेक लोकांना करणे शक्य नाही. आपण सध्या वीजेची परिस्थिती बघतो. प्रत्येक माणूस वीज संभाळून वापरतो पण पाणीबद्दल तेवढी काळजी दिसत नाही कारण आपण हे मीटरींग करीत नाही आणि २४ बाय ७ पाणी पुरवठा करणे आणि शहराला २४ बाय ७ शुध्द पाणी देणे, ही जर व्यवस्था करायची असेल तर पाण्याला मीटरींग करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय ही योजना साध्य करता येणार नाही त्यामुळे आपल्याला हा निर्णय घेणे आवश्यक राहील.

नवीन पाणीपट्टी धोरण अस्तित्वात असणे आवश्यक आहे. आपण यावर्षी दरवाढीचे जे प्रस्ताव दरवर्षी देतो त्यावर्षी दिलेल्या प्रस्तावामध्ये महापालिकेसाठी नवीन पाणीपट्टी धोरण सुचविलेले आहे आणि आपण जर ते धोरण स्वीकारले तर आपल्याला याप्रकारच्या मोठ्या योजना घेणे शक्य होतील आणि त्यानुसार शहराचे पाण्याचे प्रॉब्लेम स्लॉव्ह करायला आपल्याला मदत होईल. आपण जर विचार केला तर आपले प्रस्तावित केलेले दर जवळपासच्या नगरपालिकांच्या तुलनेतच आहे आणि इतर शहरांच्या पेक्षा कमी आहे त्यामुळे कुठलीही मोठा दरवाढ न करता आपल्याला शहरामध्ये २४ बाय ७ पाणी देणे शक्य आहे. ही पुण्यासाठी लोकांना अत्यंत चांगली संधी आहे, याचा आपण यावर्षापासून पुरेपूर सुरूवात केली पाहिजे. यावर्षी आपण जागतिक स्तरावर कर्ज उभारणीचा प्रयत्न करणार आहोत. या योजनेसाठी जायका किंवा अेडीबी सारख्या संस्थांशी चर्चा करून या प्रोजेक्टबद्दल माहिती उपलब्ध करून देऊन, त्यांच्या तज्ञासोबत काम करून आपल्याला कमीत कमी दरावर लोन उपलब्ध होईल, जेणेकरून ही योजना आपल्याला ५ वर्षामध्ये पूर्ण करता येईल, यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत.

## <u>मलनि:सारण</u>

आपण जर मलनि:सारणची मानंके पाहिली तर सांडपाणी प्रक्रिया प्रत्येक शहरामध्ये करणे आवश्यक आहे. आपल्या शहराला मोठी नदी आहे आणि आपले सांडपाणी प्रक्रिया करूनच नदीमध्ये सोडले पाहिजे हे लक्ष्य आपले असले पाहिजे. सध्या आपण पाहतो की, ७६ टक्के पाणी सांडपाणी प्रक्रियेच्या नंतर नदीमध्ये सोडले जाते. ही मॅक्सीमम कॅपेसिटी आहे. दुर्दैवाने ७६ टक्यापैक्षा कमी, बऱ्यांचदा आपण सांडपाण्यावर प्रक्रिया करतो. शहरी भारत पेक्षा आपली परिस्थिती अत्यंत चांगली आहे आणि

सरासरी शहरी भारत मध्ये ३० टक्के पाण्यावर फक्त प्रक्रिया केली जाते. मानक १०० टक्यांचे आहे सुदैवाने आपल्याकडे जायकाने मान्य केलेला, केंद्र शासनाने मान्य केलेला हजार कोटी रू.चा प्रकल्प आता मान्य झालेला आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी केल्यानंतर ३ वर्षामध्ये आपण १०० च्या जवळपास पोहचणार आहोत. ही आपल्यासाठी अत्यंत गौरवाची बाब ठरणार आहे. मलनि:सारण सुविधा उपलब्ध असणाऱ्या घरांची संख्या आपल्याकडे ९२ टक्के आहे आणि भारताची सरासरी ६३ टक्के आहे. आपल्याला १०० टक्यांचे मानांकन प्राप्त करायचे आहे. सन २०१५-१६ मध्ये जसे मी सांगितले ९९० कोटी रू.चा प्रकल्प भारत सरकार व जायका यांच्यामार्फत आपल्याला मंजूर झाला. जानेवारी २०१६ मध्ये करारावर स्वाक्षरी झालेली आहे. पाटबंधारे विभागाने ६.५ पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आपण जो करार केला होता त्याची पूर्तता खराडी येथे आपण जॅकवेलचे काम पूर्ण करून केलेले आहे. आपण ते पाणी शेतीसाठी उपलब्ध करून दिलेले आहे. सन २०१६-१७ मध्ये २०८.२० कोटी रू.ची तरतूद आपण या मल:निसारण क्षेत्रासाठी केलेली आहे. त्यात निर्माण होणारे सर्व मैलापाणी प्रक्रिया करून नदीत सोडण्यावर भर असणार आहे हे आपण जायकाच्या प्रकल्पांतर्गत कामे घेउ़न केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे जे अनुदान आहे त्यातून ११ मैलापाणी शुध्दीकरण केंद्रापैकी जास्तीत जास्त शुध्दीकरण प्रकल्प सुरू करण्याचा ह्यावर्षी मानस आहे. आपल्याला एकूण क्षमता २९६ दक्षलक्ष लिटर निर्मित करायची आहे. सध्या ४ मैलापाणी पंम्पिंग स्टेशन्स, सध्याचे आहे त्यांची क्षमतावाढीचे काम आपण सुरू करणार आहोत. तोफखाना, कल्याणीनगर, जुना कसबा आणि नवीन कसबा, ही ती केंद्रे आहेत.

## <u>घनकचरा व्यवस्थापन</u>

या दोन मानकांवर अत्यंत मोठ्या प्रमाणावर काम करण्याची आवश्यकता आहे. सध्या आपल्या शहरामध्ये घरोघरी कचरा गोळा करण्याचे प्रमाण ८० टक्के आहे ते १०० टक्के पर्यंत घेउ़न जायचे आहे आणि शहरी भारताचे प्रमाण ७२ टक्के आहे. कचऱ्यांच्या स्तोत्रांच्या जागीच विलिगीकरण करणे सध्या आपल्याकडे ४५ टक्के आहे, शहरी भारतामध्ये ते १२ टक्के आहे आणि मानंक १०० टक्के आहे. या दोन गोष्टी आपल्याला साध्य कराव्या लागतील त्यासाठी पुढच्या वर्षामध्ये, जर आपण बघितले तर, मी अगोदर सन २०१५-१६ चे थोडक्यात सांगतो. मनपा क्षेत्रात घनकचरा जिरविणेसाठी १०४.५ मेट्रीक टन क्षमतेचे प्रकल्प सुरू करण्यात आले आणि त्यामध्ये ७ टनाचे प्रकल्प पूर्ण झालेले आहेत आणि उर्वरित मार्च २०१६ पर्यंत पूर्ण होणार आहे. १०० टक्के घरोघरी कचरा उचलण्यासाठी स्वच्छ या संस्थेसोबत १ जानेवारी २०१६ ला करार करण्यात आला आणि येत्या महिना दोन महिन्यामध्ये १०० टक्के घरांमध्ये आपल्याला याची अंमलबजावणी सुरू करायची आहे. ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता बॉयोगॅस, बॉयो सी.एन.जी.निर्मित करण्याचा ३०० टनाचा प्रकल्प आपला पूर्ण झालेला आहे. येत्या काही दिवसांमध्ये त्याचा उदघाटन कार्यक्रम हाती घेण्याचा आपण विचार करीत आहोत आणि शास्त्रीय भू-भराव, मौजे प्रींप्री सांडस येथील जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही अंतिम टप्यात आलेली आहे. आणि आमची अपेक्षा आहे की, मार्च २०१६ पूर्वी आपल्याला हा ताबा मिळण्याची कार्यवाही पूर्ण होईल. सी.एस.आर.च्या माध्यमाने सुध्दा पुणे महानगरपालिकेने देशात इतर महानगरपालिकांपेक्षा मोठी भरारी गाठलेली आहे आणि पूनावाला ग्रुपकडून १०० कोटी रू.खर्च करण्याची तयारी, त्यांनी दर्शविली आहे. त्यातून घनकचरा व्यवस्थापन आणि शहरामध्ये पब्लिक टॉयलेटस आणि इतर शौचालय व्यवस्था स्थापनेसाठी भरीव मदत उपलब्ध होणार आहे. मार्च २०१६ पर्यंत ३०० मेट्रीक टन क्षमतेचे बॉयोमिथेनायझेशनचे युनिट सुरू करण्याचा, जानेवारी पासून सुरू करण्याचा आपला मानस आहे. रोकेम प्रकल्पाची क्षमता २०० मे. टनावरून ४०० मे. टनापर्यंत घेउ़न जाण्याचा आपला मानस आहे. शहरामध्ये विकेंद्रीत पध्दतीने १२०, ४ मेट्रीक टनाचे प्रकल्प कार्यान्वित होतील. स्वच्छ सोबत झालेल्या कराराप्रमाणे घरोघरी ठरलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सूक्ष्म नियोजनाप्रमाणे, घरोघरी कचरा उचलण्याचे काम सुरू होईल. सी.एस.आर.च्या माध्यमातून परत १० मे.टना अजून ६ क्रशिंग युनिटस, म्हणजे ६० मे.टन क्षमता आपण नवीन निर्मित करणार आहोत. कचरा वर्गीकरण करण्याकरीता अजून १५ ठिकाणी मार्च २०१६ पर्यंत, सॉर्टींग शेड बांधण्याचा आमचा विचार आहे. २०१६-१७ मध्ये ४०४.८३ कोटी रू.ची तरतूद घनकचरा व्यवस्थापनासाठी केलेली आहे. त्यात आपण जी महत्वाची कामे पूर्ण करणार आहोत.खतनिर्मिती व उर्जानिर्मितीचा कचरा डेपोवरील प्रकल्प, ५०० मे.टन क्षमतेचा आहे. तो डिसेंबर २०१६ पर्यंत आपल्याला पूर्ण करायचा आहे. तो पूर्ण झाल्यानंतर आपल्या शहरामध्ये निर्मित होणारा कचरा आणि आपल्या शहराच्या आजूबाजूमध्ये निर्मित होणारा कचरा व शहरामध्ये प्रक्रिया होणारा कचरा यामध्ये इक्वीलिटी येईल आणि आपल्याकडे प्रत्येक ग्रामप्रक्रियेवर, कचऱ्यावर प्रक्रिया करणे शक्य होणार आहे. डिसेंबर १६ पर्यंत हा महत्वाचा टप्पा आपल्याला गाठायचा आहे. घरोघरी १०० टक्के चरा उचलणे, वाहतूक व्यवस्था सुधारणा करण्याकरीता भरीव तरतूद करण्यात आलेली आहे. अनेकदा असे लक्षात येते की, १०० पर्सेन्ट कलेक्शन लक्षात घेता मॅकेनिझम, ट्रान्सपोर्ट व्यवस्था योग्य नसल्यामुळे तो वेळेवर उचलणे शक्य होत नाही. त्यामुळे यावर्षी घनकचरा वाहतूकवर मोठया प्रमाणात खर्च करण्याचा आपला मानस आहे.

स्वच्छ भारत अंतर्गत वर्षातील शौचालय व्यवस्थापनाचे जे उदिष्ट आहे ते पूर्ण करण्याकरीता यावर्षीच्या बजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. आपण सगळ्यांना माहिती आहे की, २०१७ गांधी जयंती पर्यंत पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये आपल्याला पूर्णपणे हगणदारी बंद करायची आहे आणि त्यासाठी आपण ३ वर्षांचा प्लॅन तयार केला आहे. या मार्चपर्यंतच्या उदिष्टासाठी आपण ह्यावर्षी पैसे, तरतूद केलेली आहे. पुढच्या मार्चपर्यंतची तरतूद ह्यावर्षी बजेटमध्ये करण्यात आलेली आहे. आवश्यतेप्रमाणे विकेंद्रीत कचरा प्रक्रिया केंद्र, नव्याने बांधण्याची तरतूद सुध्दा यावर्षी बजेट मध्ये केलेली आहे. पिंपरी सांडस येथील जागेवर शास्त्रोक्त पध्दतीने भू-भराव करण्यासाठी आवश्यक तरतूद सुध्दा यावर्षीच्या बजेट मध्ये केलेली आहे. रोकेम प्रकल्पाची क्षमता डिसेंबर अखेर ७०० मे.टन.प्रतिदिन करण्याचा विचार यावर्षी आपण करणार आहोत. त्याची सुध्दा व्यवस्था यावर्षी करणे आवश्यक आहे.

## आरोग्य

आरोग्य विभागामध्ये आपण बघितले तर आपल्या शहरामध्ये लोकसंख्येप्रमाणामध्ये बघितले तर प्रती हजारामध्ये सध्या दोन बेड उपलब्ध आहेत. शहरी भारताचे प्रमाण पाहिले तर आपल्यापेक्षा जास्त आहे म्हणजे या क्षेत्रामध्ये पुणे इतर शहरांपेक्षा मागे आहे आणि मानक ४ चे आहे. त्यामुळे आपण मानंकापेक्षा ५० टक्क्यांने कमी आहोत. यासाठी जर आपण बघितले तर आपल्याला नवीन रूग्णालय, नवीन व्यवस्था आणि अनेक पध्दतीने लोकांना सुविधा देण्यासाठी उपक्रम हाती घेणे अत्यंत महत्वाचे आहे. सन २०१५-१६ मध्ये काही नवीन सोनोग्राफी केंद्र, जननी शिशू सुरक्षा योजनेमध्ये अनेक लोकांना लाभ, सवलतीच्या दरात डायलेसिस सुविधा आपण १ ऑक्टोंबर २०१५ पासून, कमला नेहरू हास्पीटल मध्ये हा उपक्रम आपण सुरू केलेला आहे. आपण यावर्षी काही नवीन दवाखाने सुरू केले आहेत. पण जसे मी सांगितले की, आपण मागच्यावर्षी जरी हे नवीन दवाखाने सुरू केले असतील तरी पुढच्यावर्षी आपल्या यापेक्षाही जास्त नव्याने दवाखाने सुरू करणे आवश्यक आहे. त्यासाठी तरतूद पुढच्या वर्षीच्या बजेट मध्ये करण्यात आलेली आहे. एकूण तरतूद २०७.३३ कोटी.रू.ची आहे. त्यामध्ये आपण हे काही नवीन उपक्रम हाती घेणार आहोत. कुष्ठरूग्णांना दरमहा १ हजार रू.आर्थिक सहाय उपलब्ध करून देण्यासाठी तरतूद केली आहे. अपंगात्वावर उपचार करण्याकरीता BERA Test (Brainstem auditory evoked response audiometry) ही सुविधा आपण आपल्या रूग्णालयांमध्ये सुरू करणार आहोत. आपल्याला नव्याने जे काम करावयाचे त्यामध्ये मित्रमंडळ चौक येथे २० खाटांचे प्रसृतीगृह व बाह्यरूग्ण विभाग सुरू करावयाचा आहे. वडगावशेरी येथे बाहय रूग्ण विभाग व प्रयोगशाळा, सुरू करायची आहे सिंहगडरोड व महाराष्ट्र हौसिंग बोर्ड येथे बाहय रूग्ण विभाग सुरू करायचा आहे. एरंडवणा रामनगर येथील दवाखान्यांमध्ये सोनोग्राफी केंद्र सुरू करण्यात येणार आहे. कै. चंदुमामा सोनवणे प्रसुतिगृह येथे संयुक्त विद्यमाने डायलेसिस युनिट सुरू करायचे आहे. पीपीपी तत्वावर मल्टीस्पेशालिटी अद्ययावत रूग्णालय वारजे, हर्मेस येरवडा, पिनाक मेमरीज , गोसावी वस्ती वानवडी येथे सुरू करायचे आहे. अत्याधुनिक नेत्र चिकित्सा रूग्णालय सुरू करायचे आहे. भाऊ पाटील रोड, बोपोडी येथील ताब्यात आलेल्या इमारतीमध्ये AIIMS, चे धर्तीवर, पुणे मनपा बरोबर संयुक्त विद्यमाने ३० खाटांचे अत्याधुनिक नेत्र चिकित्सा व उपचार रूग्णालय सुरू करायचे आहे. कै. थरकुडे दवाखाना, एरंडवणा येथे नेत्रचिकित्सा व दंतचिकित्सा विभाग सुरू करण्यात येणार आहे. पुणे मनपाच्या १७ रूग्णालयांमध्ये डॉयग्नोस्टीक सेंटर्स, कारण लोकांना आता डॉयग्नोस्टीक सेंटरवर जाऊन, विविध तपासण्यासाठी प्रचंड खर्च करावा लागतो. तर खाजगी मध्ये उपचार करायला डायग्नोस्टीक्स आवश्यक असते. हा प्रचंड खर्च होऊ नये, लोकांना ही सुविधा सवलतीच्या दरावर उपलब्ध व्हावी, म्हणून पुणे मनपाच्या १७ प्रयोगशाळा पी.पी.पी.तत्वावर चालविण्यास आपण सुरूवात करणार आहोत. यावर्षी पुणे मनपाचा कोंढवा येथील कत्तलखाना कार्यान्वित करण्याचा आपला मानस आहे.

## नगरनियोजन

जुन्या हद्दीमधील ज्या पेठा आहेत. यावर्षी आपण मोठ्या प्रमाणावर स्ट्रक्चरल ऑडिट केले. त्यामध्ये काही धोकादायक मिळकतींवर कारवाई सुध्दा करण्यात आली आहे. ३० वर्षापूर्वीच्या इमारतींचे सुध्दा स्ट्रक्चरल ऑडिट पूर्ण करण्यात आले. त्यामध्ये २१३ असुरक्षित मिळकतींना नोटीसा देण्याची कारवाई सुरू आहे. ती ॲक्शन लवकरात लवकर संपविणे आवश्यक आहे आणि त्यांच्यावर योग्य कारवाई करणे आवश्यक आहे. यावर्षी मान्य ले-आऊटनुसार ७३९ ॲमेनिटी स्पेसेस निर्मित झाले यापैकी ४८६ ॲमिनिटी स्पेसेस प्रत्यक्ष ताब्यात आलेल्या आहेत. ताब्यात आलेल्या ॲमिनीटी स्पेसेस पैकी २२२ ॲमिनिटी स्पेस वर वापर उपयोग सुरू केलेला आहे. या वर्षी या विभागामार्फत ज्या प्रमुख योजना प्रस्तावित आहेत. ऑनलाईन झोन नकाशे व दाखले उपलब्ध होण्यासाठी मोबाईल ॲप्लीकेशन तयार करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी नागरिकांना महापालिकेमध्ये येण्याची आवश्यकता भासणार नाही व सदरची सुविधा नागरिकांना २४ तास उपलब्ध राहणार आहे, अशी तरतूद करणार आहे. बांधकाम परवानगीसाठी एक खिडकी योजना राबविणे. आपल्याला विदीत आहे की, महाराष्ट्र शासनाने सेवा हमी कायद्याने १५ सेवा निश्चित केल्या आहेत. त्यातील एक बांधकाम परवानगी ही सेवा आहे. यासाठी वेळेचे बंधन आहे. हे वेळेत कसे देता येईल? आणि बांधकाम व्यावसायिकाला किंवा सामान्य नागरीकाला कुठल्याही प्रकारच्या एन.ओ.सी.ची आवश्यकता न पडता एक खिडकीच्या माध्यमाने कसे देता येईल? याची व्यवस्था आपण करीत आहोत. याची आज्ञावली आणि व्यवस्था पूर्ण करण्याचे काम पूर्ण होत आलेले आहे. येत्या काही दिवसांमध्ये ही एक खिडकी योजना राबविण्यास सुरूवात करणार आहोत. बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने 'ऑनलाईन पेमेंटची गेटवे' संकल्पना राबवायची आहे. पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट येवलेवाडी गावाचा विद्यमान जमीन वापर सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे आणि प्रारुप विकास आराखडा तयार करावयाचा आहे. पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतीचे हवाई सर्वेक्षण करण्याचे सुध्दा आपण यावर्षी प्रस्तावित करीत आहोत. त्याद्वारे अनाधिकृत बांधकामे शोधणे व कर आकारणी नसलेल्या मिळकती शोधण्यासाठी व यातून महसूल वाढविणे आणि अनधिकृत बांधकामांवर वचक आणण्यास हे उपयोगी ठरणार आहे. शहरातील सुंदर वास्तूकला असलेल्या इमारती व पर्यावरणपूरक (ग्रीन बिल्डींग) इमारतींसाठी स्पर्धा आयोजित करुन त्यांना प्रोत्साहन देण्याचा आमचा मानस आहे. शासनाकडे सादर करण्यात आलेल्या प्रारूप विकास नियंत्रण नियमावलीमध्ये पुढील नियमांचा समावेश आहे. हे आपल्या शहरासाठी अत्यंत महत्वाचे आहे आणि भविष्यामध्ये याचे दूरगामी परिणाम आपल्याला दिसतील. काही साईजपेक्षा जास्त असलेल्या इमारतींना पावसाळी पाण्याची साठवण (Rain Water Harvesting) बंधनकारक करण्यात आलेले आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी इंटीग्रेट सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट त्या इमारतींना बंधनकारक करण्यात आलेले आहे. एका विशिष्ट साईजपेक्षा जास्त इमारतींना त्यांच्या छतावर सौरऊर्जा निर्मिती करणे हे बंधनकारक करण्यात आलेले आहे. सांडपाण्याचा पुर्नवापर सुध्दा एका विशिष्ठ साईजपेक्षा जास्त ले आऊट असेल तर त्यांना Grey Water Reuse बंधनकारक करण्यात आलेले आहे. ग्रीन बिल्डींगची निर्मिती प्रोत्साहन देण्याकरीता अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक देण्याची तरतूद पहिल्यांदा आपण आपल्या डी.सी.रेग्युलेशन्स मध्ये केली आहे. पुणे

इन्फ्रास्ट्रक्चर फंड ही संकल्पना डी.सी.रेग्युलेशन्स प्रस्तावित करण्यात आलेले आहे आणि विकास परवानगीची प्रक्रिया सुलभ व गतीमान करण्याकरीता कुठल्याही एन.ओ.सी.ची आवश्यकता राहू नये याची व्यवस्था करणे व एक खिडकी योजनेच्या माध्यमाने बांधकाम परवानग्या उपलब्ध करून देणे, ही व्यवस्था या डी.सी.रूल्स मध्ये प्रस्तावित करण्यात आलेली आहे. शासनाच्या विचाराधीन आहे. हे मंजूर झाल्यानंतर, ही योजना आपल्याला कार्यान्वित करणे शक्य होणार आहे.

## भू–संपादन व व्यवस्थापन

यावर्षी या खात्यामार्फत काही ठळक बाबी पूर्ण करण्यात आल्या आहेत त्याचा उल्लेख या स्लाईड मध्ये करण्यात आला आहे. सन २०१६–१७ साठी ७५ कोटी ची तरतूद या विभागासाठी आपण केली आहे. प्रामुख्याने एच.सी.एम.टी.आर.च्या भूसंपादनांसाठी विशेष भर द्यायचा आहे.

हडपसर ससाणेनगर येथील उड्डाण पुलासाठी आवश्यक असणा–या ३ डी.पी.रस्त्यांची संयुक्त मोजणी यशस्वीपणे पूर्ण करणे आवश्यक आहे ते लवकर करणे आवश्यक आहे जेणे करून आपण हा उड्डाणपूल पुढच्या वर्षी मार्च पर्यंत पूर्ण करू शकणार. घनकचरा व्यवस्थापनाचे प्रकल्प आहेत त्यांच्या ज्या जागा ताब्यात घ्यायच्या आहेत त्या जागांच्या संपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे. सावित्रीबाई फुले स्मारकासाठी लवकर जागा ताब्यात घेण्याचा व ते पूर्ण करण्याचा आपला मानस आहे.

## वाहतूक नियोजन व प्रकल्प

आपण जर सार्वजनिक वाहतूकीचा वापर पाहिला तर पर्सेन्टेजवाईज ट्रीप्स म्हणजे दिवसामध्ये आपल्या जेवढ्या ट्रीप्स होतात त्यांच्या किती टक्के ट्रीप्स सार्वजनिक वाहतूकीच्या असतात? तर पुण्यामध्ये सध्या १८ टक्के आहे. शहरी भारताचा हा फिगर ३० टक्के म्हणजे आपल्यापेक्षा चांगला आहे आणि आपला कॉम्प्र हेन्सीव्ह मोबालिटी प्लॅन, समकक्ष मोबालिटी आराखडा तयार केला आहे त्यामध्ये आपण ५० टक्के उदिष्ट ठेवलेले आहे. त्यामुळे यामध्ये फार मोठी झेप घेणे आवश्यक आहे. नॉन मोटराईज्ड वाहतूक म्हणजे वॉकींग, सायकलिंग इ. यासाठी सध्या पुण्यामध्ये ३३ टक्के ट्रीप्स याप्रमाणे आहेत. शहरी भारताचे मानक ४० टक्के आहे त्यामुळे यामध्ये सुध्दा मोठ्या प्रमाणामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे प्रतिलक्ष, बस संख्या ४१ आहे. भारतातील इतर शहरांची जर तुलना केली तर ती ४६ आहे आणि मानक ५५ इतके आहे. त्यामुळे इथेही आपल्याला मोठ्या प्रमाणात सुधार करण्याची आवश्यकता आहे. वाहतूकीचा वेग जर बघितला तर सरासरी प्रती कि.मी.प्रती तास, रोडवर स्पीड किती असतो? तर तो पुण्यामध्ये पर ऑवर १८ कि.मी.इतका आहे. शहरी भारतामध्ये २० आणि मानक ३० चे आहे, म्हणजे आपण सर्व बाबींवर वाहतूक नियोजनामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये काम करण्याची आवश्यकता आहे म्हणजे एक लक्षात येते की, श्वाश्वत वाहतूकीची व्यवस्था पुण्यामध्ये करणे, अत्यंत आवश्यक आहे. इंग्रजी मध्ये एक चांगली म्हण आहे आणि ती समोर ठेवून आपण बजेट मांडण्याचा प्रयत्न केला आहे. A devlop country is not were poor have cars they were the rich public transport. ही म्हण जोपर्यंत आपण अंगीकृत करीत नाही. तोपर्यंत आपल्याला आपली वाहतूकीची समस्या सोडविण्यास मदत होणार नाही. त्यामुळे ह्यावर्षी श्वाश्वत वाहतूकीकडे आपण विशेष लक्ष घातलेले आहे. आपण जर सन २०१५–१६ चे पाहिले तर स्वारगेट उड्डाणपूल खुला करण्यात आला अभियांत्रिकी महाविद्यालय रेल्वे ओव्हरब्रीज रूंदीकरण करून नागरीकांसाठी खुला करण्यात आला. नदी सुधारणा प्रकल्पांतर्गत बंडगार्डन बंधारा येथे डिसेंबर २०१५ मध्ये लोखंडी दरवाज्यांचे परिचालन सुरू करण्यात आले. बी.आर.टी.मार्ग, विश्रांतवाडी–संगमवाडी ७ कि.मी., आय.टी.एम.एस.यंत्रणेसह ऑगस्टमध्ये सुरू करण्यात आला. पौड रोड येथील पादचारी भुयारी मार्ग बांधणे, हे पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. पुणे–सोलापूर रस्त्यावर हडपसर गाडीतळ येथे उड्डाणपूल बांधणे हे काम मार्च २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचा मानस आहे. मनपा भवन ते नवापूल पादचारी पूल हा सुध्दा पूर्ण करणे आवश्यक आहे. मेडिपॉईंट हॉस्पिटल ते बाणेर रस्ता रामनदीवर पूल बांधणे.औंध आणि बाणेरला जोडणारा पूल, बालेवाडी, स.नं. ४६/४७ येथे मुळा नदीवर ६ पदरी पूल बांधण्याचे काम ७० टक्के पूर्ण आहे. ते ही लवकर पूर्ण करावयाचे आहे आणि डेंगळे पूलाच्या मजबूतीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. ते सुध्दा मार्च १६ पर्यंत पूर्ण करण्याचा आमचा मानस आहे.

पुढील वर्षी हॅरिस पूलालगत नवीन पूल, बालेवाडी सर्व्हे न.४६/४७ मुळा नदीवर ६ पदरी पूल बांधायचा आहे. मुंढवा सर्व्हे नं.८९ ते ७१ दरम्यानचे २४ मीटर एच.सी.एम.टी.आर.साठी पुणे सोलापूर रेल्वे लाईनवर रेल्वे ओलांडणी पूल बांधायचा आहे. मुंढवा येथील नदीवर पूल बांधायचा आहे. स्वारगेट चौकातील उड्डाणपूल पूर्ण करायचा आहे. वारजे येथील युनिव्हर्सल चौक उड्डाणपूल पूर्ण करायचा आहे. पुणे शहरातील नदीवरील पूलांची देखभाल दुरूस्तीची कामे मोठ्या प्रमाणात सुरू केली आहेत. ते सर्व पूर्ण करायचे आहेत. ११ चौकांचे विकसन नव्याने करण्याचा प्रस्ताव आहे.

मेट्रो प्रकल्प सध्याच्या किंमतीनुसार, हे दोन्ही मार्ग पूर्ण करण्याकरीता ११,५२२ कोटीचा प्रकल्प केंद्र शासनापर्यंत सादर झालेला आहे. केंद्र शासनाकडे या पुढच्या कालावधी मध्ये पब्लिक इन्व्हेस्टेंमेट बोर्ड व केंद्रीय कॅबिनेटची मान्यता मिळाल्यानंतर हा प्रोजेक्ट यावर्षी सुरू होईल, असा आमचा प्रयत्न आहे आणि ह्या वर्षी हा प्रोजेक्ट सुरू होईल. येत्या ५ वर्षामध्ये पुण्यातील या दोन्ही मार्गिकांचे काम आपल्याला पूर्ण करायचे आहे.

सन २०१६१७ मध्ये शहरातून वाहणाऱ्या नद्यांची एकूण लांबी ४० कि.मी.आहे. आपण याचे सुशोभिकरण व चांगले रिव्हर फ्रेम डेव्हलपमेंटचे काम हाती घेण्याकरीता मा.स्थायी समितीच्या मंजूरीने सल्लागाराची नेमणूक केलेली आहे आणि याचा दूरदृष्टी प्लॅन तयार करण्याचे काम सुरू झालेले आहे. येत्या ८ महिन्यांमध्ये हा पूर्ण आराखडा तयार होईल. हा आराखडा मंजूर झाल्यानंतर नदी सुधारचे काम आपल्या शहरामध्ये सुरू करावे लागेल. जर एक चांगला आराखडा तयार झाला त्यासाठी आपण सगळे प्रयत्न करीत आहोत. नद्यांना अत्यंत चांगले, भव्य स्वरूप देणे आणि शहरासाठी एक अत्यंत चांगले पर्यटन स्थळ, जिथे

आपले लोक जाऊ शकतात. यामुळे आपल्या शहराचा लौकिक देशात व आंतरराष्ट्रीय समूहामध्ये वाढेल, अशा प्रकारचे रिव्हर फ्रेम डेव्हलपमेंट करण्याकरिताचे काम हाती घेतलेले आहे. सध्या याची तरतूद जरी ५ कोटीची असली तरी हा आराखडा तयार झाल्यानंतर या आराखड्याच्या फायनिशिअल प्लॅननुसार, आपल्याला पुढची तरतूद करावी लागेल आणि त्याप्रमाणे हा आराखडा अंमलबजावणी करण्याची कार्यवाही, यावर्षापासून आपल्याला सुरू करायची आहे. वाहतूकीचा आणि पथ विभागाचा विचार केला तर यावर्षी आपण अत्यंत मोठे पाऊल उचलले आणि ते म्हणजे रेनबो बी.आर.टी.सुरू करणे. आपण जर याचा अभ्यास केला तर त्या भागामध्ये बसमधून वाहतूक करणाऱ्या माणसांची संख्या जवळपास २ पट झाली आणि त्याठिकाणी आकडे असे म्हणतात की, ६ टक्के लोकांनी आपले दुचाकी वाहन सोडून बस मध्ये प्रवास करणे सुरू केलेले आहे, याचा अर्थ मोडल शिफ्ट सुध्दा याठिकाणी झालेले आहे. रेनबो बी.आर.टी.त्या मानाने यशस्वी झाली, असे म्हणायला हरकत नाही आणि हे आकडे सिध्द करतात. यानंतर आपण नगररोडला बी.आर.टी.सुरू करणार आहोत. त्यामध्ये काही अडचणी आहेत परंतु त्या दूर करून ते लवकरात लवकर आपल्याला सुरू करायचे आहे. आपल्या शहरामध्ये ३ वर्षामध्ये ७० कि.मी.बी.आर.टी.चे जाळे विकसीत करण्याचे उदिष्ट आहे, आणि त्यानुसार बी.आर.टी.चे जाळे निर्मित करण्यासाठी या बजेट मध्ये भरीव तरतूद करण्यात आलेली आहे. या मार्गांसाठी प्रती कि.मी.अंदाजे ४ कोटी रू.इतका खर्च येतो. त्या हिशोबाने आपण तरतूद केलेली आहे. आपण जर हा ग्राफ बघितला तर कॉम्प्रहेन्सीव्ह मोबॉलिटी प्लॅन मधून आपण काढलेला आहे. त्यामध्ये सिध्द होते की, आपण जर बी.आर.टी.केले तर पुण्यामध्ये सार्वजनिक वाहतूकीची सध्याची जी टक्केवारी आहे ती आपल्याला ७० टक्क्यांच्या वर घेऊन जाणे शक्य आहे आणि जे मेट्रोमुळे शक्य नाही ते आपण बी.आर.टी.ने शक्य करून दाखवू शकतो, अशी सुध्दा एक माहिती समोर येत आहे. त्यामुळे पुढील ३ वर्षे आपल्याला बी.आर.टी.विशेष लक्ष केंद्रीत करायचे आहे. त्यासाठी यावर्षीच्या बजेटमध्ये १२५ कोटी रू.ची भरीव तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे. आता एकूण मार्ग १६ कि.मी.चे आहेत. जसे मी सांगितले की, विश्रांतवाडी–संगमवाडी मार्ग सुरू केला आणि येरवडा–वाघोली मार्ग लवकर सुरू करायचा आहे. हे दोन्ही मार्ग मिळून १६ कि.मी.आहे. त्यातील प्रवासी संख्या जवळपास दुप्पट झालेली आहे आणि मोड्यूल शिफ्ट ६ टक्के झालेला आहे. यासाठी सस्टेनेबल मोबोलिटी ॲवार्डसमधून पुणे महानगर परिवहन महामंडळाला outstanding contribution due sustainable mobility ला रेनबो बी.आर.टी.पुणे पिंपरी चिंचवडला हा पुरस्कार सुध्दा देण्यात आलेला आहे. यावर्षी आपण जे नवीन ३० कि.मी.लांबीचे मार्ग प्रस्तावित केलेले आहेत. जुना पुणे मुंबई रस्ता, गणेश खिंड रस्ता, जंगली महाराज रस्ता, कर्वे रस्ता,पौड रस्ता, सिंहगड रस्ता, शास्त्री रस्ता या रस्त्यांवर ज्या ठिकाणी दोन्ही साईडला बी.आर.टी. शक्य आहे, ज्या ठिकाणी वन साईडेड बी.आर.टी.शक्य आहे त्याठिकाणी वन साईडेड असे करून ३० कि.मी.लांबीचे बी.आर.टी.चे मार्ग आपल्याला यावर्षी पूर्ण करायचे आहे. शहरामध्ये श्वाश्वत वाहतुकीचा दुसरा पर्याय सायकलिंग आहे. आपले शहर सायकलिंग सिटी म्हणून ओळखले जात होते कालातंराने दुचाकी आणि चारचाकी वाहनांकडे जास्त कल गेल्यामुळे इतर शहरांमध्ये जेवढी वाढ झाली नाही तेवढी वाढ पुण्यामध्ये झाली. आज व्हेईकलच्या पर कॅपिटल वाढीच्या संख्येमध्ये जर विचार केला तर सर्वात पुढे पुणे हे शहर आहे. त्यामुळे आता आपल्याला परत सायकलिंग सिटीकडे जाणे आवश्यक आहे. अन्यथा आपण जर ह्या पध्दतीने पुढे जात गेलो तर आपण आपल्या वाहतूकीच्या समस्येचे निराकरण करू शकणार नाही. शहरासाठी सायकल प्लॅन तयार करण्याकरीता मा.स्थायी समितीने सल्लागाराच्या नेमणूकीस मान्यता दिलेली आहे. आपण ऑगस्ट २०१६ पर्यंत शहरासाठी सायकल प्लॅन तयार करणार आहोत आणि संपूर्ण शहरामध्ये इतर देशांमध्ये किंवा आपल्या इतर शहरामध्ये आता सुरू होत आहे. उदाहरणार्थ आता भोपाळ मध्ये सुरू होत आहे. काही प्रमाणात बंगलोर मध्ये सुरू झालेले आहे, अशा प्रकारचे पब्लिक बायसिकल शेअरींग सिस्टीम, आंतरराष्ट्रीय निविदा काढून आपल्या शहरामध्ये सुरू करण्याचा मानस आहे. यासाठी आपल्या बजेटमध्ये २५ कोटी रू.ची तरतूद करण्यात आलेली आहे. सायकल प्लॅनसाठी शहरात ठिकठिकाणी मूलभूत सुविधा निर्मित करण्याचा सुध्दा आमचा मानस आहे. तिसरा सर्वात महत्वाचा घटक पब्लिक ट्रान्सपोर्ट, सायकलिंग, इनफॅक्ट सर्वात महत्वाचा घटक आपला जो पादचारी आहे आणि आपल्या शहरामध्ये वॉकिंग इन्फ्रास्ट्रक्चर चांगले असणे, अत्यंत आवश्यक आहे. याशिवाय आपले जे उदिष्ट आहेत की, नॉन मोटराईज्ड वाहतूक वाढविण्याचे ते साध्य करू शकणार नाही. शहर पादचाऱ्यांसाठी सुरक्षित आणि सुविधामय करायचे आहे जेणेकरून लोक वॉकिंगकडे वळतील, यासाठी या बजेट मध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. सर्वप्रथम पादचारी सुरक्षितता आणि सुविधासाठी नवीन धोरण प्रस्तावित करण्यात येणार आहे. सध्या हे धोरण प्रशासनामार्फत तयार करण्यात येत आहे. येत्या काही दिवसांमध्ये महापालिकेच्या मुख्यसभेमध्ये सादर केले जाईल. आपण या धोरणाचे नाव वॉक स्मार्ट, असे दिले आहे आणि पादचारी सुरक्षा आणि सुविधांसाठी हे धोरण आहे. पुणे हे पादचाऱ्यांचे शहर म्हणून ओळखले जावे यासाठी पादचाऱ्यांचा सन्मान, सुरक्षा, स्वास्थ, यांची योग्य त्या धोरणांच्या आधारे काळजी घेणे आवश्यक आहे. रस्त्यांची मांडणी सुध्दा करताना आणि देखभाल दुरूस्ती सुध्दा करताना सर्वात पूर्वी पादचाऱ्यांचा विचार करणे आवश्यक आहे. पुढील ३ वर्षांमध्ये आपण जे नियोजन केले आहे ते याप्रमाणे आहे. सुमारे २२५ कि.मी.लांबीचे शास्त्रोक्त पध्दतीने डिझाईन केलेले, संपूर्ण व्यवस्था असलेले पादचारी मार्ग विकसीत करण्याचा प्रोजेक्ट आपण हाती घेणार आहोत. त्यातील ७५ कि.मी.पहिल्या ह्या वर्षी आपण ७५ कोटी रू.ची तरतूद यावर्षी केलेली आहे आणि त्यातील शहरातील महत्वाचे ७५ कि.मी.चे फूटपाथ वॉकिंगसाठी संपूर्णपणे सज्ज असे तयार करणार आहोत. श्वाश्वत वाहतूक कक्ष, महानगरपालिकेमध्ये स्थापन करण्यात येणार आहे. त्याची जाहिरात सुध्दा काढण्यात आलेली आहे. आपण आपल्या अधीक्षक अभियंत्यांच्या अध्यक्षतेखाली श्वाश्वत वाहतूक कक्ष स्थापन करणार यासाठी तज्ञ, बाहेरून घेणार आहोत आणि ५ ते ६ तज्ञ आणि ४ ते ५ इजिनिअर्स अशा १० ते ११ लोकांचा हा सेल, आपल्या महापालिकेमध्ये कार्यान्वित होणार आहे. या माध्यमाने पब्लिक ट्रान्सपोर्ट, सायकलिंग आणि वॉकिंग या तीन मुद्द्यावर पुढील ३ वर्षात विशेष भर देण्याचा आमचा मानस आहे. मी मागच्या स्लाईड मध्ये सांगितले की, यावर्षी उच्च दर्जाच्या ७५ कि.मी.लांबीच्या पादचारी मार्गाची निर्मिती करायची आहे त्यासाठी सन २०१६–१७ च्या बजेट मध्ये ७५ कोटी रू.ची तरतूद केली आहे. याशिवाय महानगरपालिकेने नवीन पार्किंग धोरण

अंमलात आणणे आवश्यक आहे. पब्लिक ट्रान्सपोर्टचा प्रश्न, पब्लिक ट्रान्सपोर्ट नसल्यामुळे होत नाही तर प्राव्हेट ट्रान्सपोर्ट हे स्वस्त आणि त्यामध्ये कुठल्याही प्रकारची बंधने नसल्यामुळे लोकांना पब्लिक ट्रान्सपोर्टकडे वळविणे शक्य होत नाही. त्यामुळे वाहतूकीच्या समस्या निर्मित होतात. त्यामुळे पुणे शहरामध्ये नवीन पार्किंग धोरण याचे नाव आपण सुरूवात दिलेले आहे. तो आपण प्रस्तावित केला आहे. सुरूवातच्या माध्यमाने रस्त्यावरील पार्किंग व धोरणांची अंमलबजावणी कडक करणे, शक्य होणार आहे. योग्य पार्किंगचे दर लावल्याशिवाय, पार्किंगची जी वाढत चाललेली मागणी आहे ती कमी होणार नाही. त्यामुळे पार्किंगला योग्य दर लावण्याचा प्रस्ताव, आपण यापुढे महासभेमध्ये आणणार आहोत. यावर्षी पार्किंगला कोणतीही सबसिडी न देण्याचा आमचा मानस आहे आणि त्याप्रमाणे मा.महासभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात येईल. पार्किंगला योग्य दर लावलेच पाहिजे जेणेकरून लोक विचार करूनच वाहने आणतील आणि त्याबद्दल विचार करतील. श्वाश्वत वाहतूकीला प्राधान्य देण्याकरीता चांगले पार्किंग धोरण असणे आवश्यक आहे. पार्किंग चार्जेस मधून जे प्राप्त होणारे उत्पन्न आहे. तो फक्त आणि फक्त श्वाश्वत वाहतूकीसाठी वापरला जाईल, अशी तरतूद बजेट मध्ये केलेली आहे.पार्किंगची संख्या मर्यादीत करणे सुध्दा आवश्यक आहे. पार्किंग एक मॅग्नेटसारखे असते. आपण जेवढे पार्किंग वाढविले तेवढी गाड्यांची संख्या सुध्दा वाढते त्यामुळे गाडयांचा प्रश्न सुटेल किंवा सार्वजनिक वाहतूकीचा प्रश्न किंवा शहराच्या वाहतूकीचा प्रश्न सुटेल असे म्हणणे योग्य नाही. आपल्याला यावर कुठेतरी बंधने आणणे आवश्यक आहे.

**<u>पथ विभाग.</u>**

याशिवाय संपूर्ण शहराला जी महत्वाची बाब जाणवते ती आहे रस्ते खोदाई बद्दलची त्यामुळे रस्ते खोदाई पोटी सन २०१५-१६ मध्ये २३० कोटी रू.मनपाला प्राप्त झाले आणि यातून लोकांना ज्या अडचणी निर्मित होतात. कधी कधी फूटपाथ तोडले जातात, रस्त्यावर अडचणी निर्मित होतात. हे सध्या कसे दूर करता येईल? याबाबत आपण धोरण तयार करीत आहोत आणि यापुढील स्लाईडमध्ये मी त्याचा उल्लेख करणार आहे. ४० कि.मी.लांबीचे डांबरी रस्ते व सुमारे ३.५ कि.मी.चे सिमेंट कॉंक्रीट रस्ते तसेच अंतर्गत रस्ते यु.टी.डब्ल्यु.टी.ने पूर्ण करण्यात आले. स्टॅन्डिंग टेक्नीकल ॲडव्हॉयजरी कमिटीच्या अहवालानुसार आता आपण अमंलबजावणी सुरू केलेली आहे. आपण सर्वांना माहिती आहे की, स्टॅग कमिटी, हायकोर्टच्या आदेशाप्रमाणे पुणे महानगरपालिकेने स्थापित केलेले आहे.

शिवणे ते खराडी नदीकाठ्चा १००फुटी रस्त्याचे काम सुध्दा प्रगतीपथावर आहे. पुढच्यावर्षी ४५७.६१ कोटी एवढी तरतूद पथ विभागाला दिलेली आहे. खोदाई व रिन्ईन्स्टेंटमेंटसाठी नवीन धोरण तयार करीत आहेत ते पूर्णत्वाच्या टप्याला आलेले आहे. स्ट्रेन्चिंग पॉलिसी, पुणे सिटी असे हे आपले धोरण असणार आहे. प्रभागनिहाय मोबाईल दुरूस्ती, पथ कर, स्ट्रीट ॲम्बुलन्सेस यावर्षी बजेट मध्ये प्रस्तावित केलेले आहेत. प्रत्येक वॉर्डला १ कोटी रू. याप्रमाणे १५ कोटी रू.ची तरतूद करण्यात आलेली आहे आणि जसे माणसांचे ॲम्बुलन्सेस असतात तसे रोडचे ॲम्बुलन्सेस सुध्दा राहतील, ठिकठिकाणी रोड मध्ये कुठेही दुरूस्ती पाहिजे असेल तर हे मोबाईल मेंटेनन्स युनिट त्याठिकाणी जाऊन लगेच त्या दुरूस्तीचे काम करतील. नवीन बॅच मिक्स प्लॅन्टचे काम करण्यात येणार आहे. प्रमुख चौकांचे मास्टीक अल्फास्टीकरण करणे, ४०० कि.मी.रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणे, कल्व्हर्टची रूंदी वाढविणे इ.कामे प्रस्तावित आहे. रस्ते अधिक सुरक्षित करण्यासाठी स्ट्रीट फर्निचरचे काम मोठ्या प्रमाणामध्ये हाती घेणार आहे. यावर्षी अवेळी झालेल्या पावसामुळे शहरामध्ये प्रचंड ताण निर्मित झाला होता अनेक लोकांना त्यांच्या जीवनासमोर मोठे प्रश्न निर्मित झाले होते. अनेक घरांमध्ये पाणी गेले होते, नागरीकांना फार त्रास सहन करावा लागला होता. याचा विचार करून यावर्षी बजेट मध्ये पावसाळी पाणी गटारांसाठी भरीव तरतूद केलेली आहे आणि याचे नियोजन करताना ज्या ज्या भागामध्ये ह्यावर्षीच्या पावसामुळे किंवा मागच्या ३ ते ४ वर्षाच्या पावसाचा अभ्यास करून अडचण निर्मित झाल्या आहेत. त्या स्पॉटचा विचार करण्यात आला आहे. सुमारे ४८० कोटी रू.चा प्रकल्प अहवालास मा.स्थायी समिती व मुख्य सभेने मान्यता दिलेली आहे. तो अहवाल तयार आहे. हा ४८० कोटी रू.चा प्रकल्प येत्या ४ वर्षामध्ये पूर्ण करण्याचा प्रशासनाचा प्रस्ताव आहे. त्यातील टप्पा क्र.१ मध्ये १२२ कोटी रू.ची तरतूद यावर्षीच्या बजेट मध्ये सन २०१६-१७ च्या बजेट मध्ये प्रस्तावित केलेली आहे. सर्व २३ बेसीन्समध्ये ही कामे प्रस्तावित केलेली आहेत आणि जसे मी सांगितले की, मागील ३ ते ४ वर्षांचा अभ्यास करून ज्या ज्या भागामध्ये पावसामुळे अडचणी निर्माण झाल्या होत्या, अशा सर्व भागांची निवड कामांसाठी, यावर्षी केलेली आहे आणि या १२२ कोटी रू. मध्ये शहराच्या या प्रमुख भागामध्ये होणारी अडचण दूर करण्याचा आपला प्रयत्न असणार आहे.

**<u>समाज विकास विभाग</u>**

समाज विकास विभागाच्या या स्लाईड मध्ये एकंदरीत लाभार्थ्यांची संख्या देण्यात आलेली आहे. प्रत्येक योजना निहाय लाभार्थ्यांची संख्या आपल्या समोर आहे. आपल्याकडे एकूण लाभार्थ्यांची संख्या ५८५७६ इतकी आहे. नागरवस्ती पुरस्कृत १३१०० बचतगटांचे संगणीकरण करण्याचा प्रस्ताव सन २०१६-१७ मध्ये आहे. एकूण बजेट ४० कोटी रू.चे आहे. क्षेत्रिय कार्यालयावर बचतगटांचा महासंघ स्थापन करण्याचा प्रस्ताव यावर्षी आहे. महिला बचतगट उत्पादित मालाच्या विक्रीसाठी कायमस्वरूपी विक्री केंद्रे सुरू करण्याचा आमचा मानस आहे. पुणे शहरामध्ये नागरीकांचा सहभाग व या पुढच्या भविष्यामध्ये नागरीकांना शहराच्या विकासामध्ये योगदान कसे देता येईल? शहराच्या विकासाशी संबंधीत व्यवसाय कसा करता येईल? शहराच्या विकासामध्ये त्यांचे प्रयत्न कसे असू शकतात? याचा गायडन्स देण्याकरीता, कौन्सिलिंग देण्याकरीता यावर्षी नव्याने एक लाईट हाऊस प्रकल्प सूचित केलेला आहे आणि प्रत्येक वॉर्ड मध्ये एक लाईट हाऊस निर्मित करण्याचा आपला मानस आहे. त्याबद्दल जास्त तपशीलवार माहिती बजेट मध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**<u>उद्यान</u>**

सन २०१५-१६ मध्ये कात्रज कै. नानासाहेब पेशवे तलाव येथे ४५० मी लांबीचे फुलराणी ट्रेनचे काम पूर्ण करण्यात आले. पुणे महानगरपालिका मुख्य इमारतीसमोरील उद्यानाचे नुतनीकरण काम आता पूर्ण होणार आहे. हडपसर येथील

आंतरराष्ट्रीय दर्जाचे शुटींग रेंजमध्ये पुर्वीच्या १० मी. व ५० मी. रेंज व्यतीरिक्त नव्याने २५ मी. रेंजचे काम पूर्ण करण्यात आले. सोमेश्वरवाडी येथील ग्रामसंस्कृती उद्यान पूर्ण केले.

सन २०१६-१७ मध्ये ५४.२७ कोटी गार्डनसाठी तरतूद केली आहे. त्यामध्ये स्वर्गीय राजीव गांधी प्राणी संग्रहालय येथे नवीन खंदक बांधणे. पाटबंधारे विभागाच्या मोकळया दोन कॅनालच्या मोकळया जागेमध्ये उद्यान विकसीत करणे. छत्रपती संभाजी उद्यानामधील अस्तित्वातील मत्स्यालयाचे विस्तारीकरण व सुधारणा कामे करणे व स्वर्गीय राजीव गांधी प्राणी संग्रहालय, कात्रज येथे नवीन आधुनिक सर्पोद्यान विकसित करण्याचा आमचा मानस आहे.

## विद्युत

पुणे महानगरपालिकेंच्या इमारतींवर Roof Top Photo Voltaic Cell (RTPV) च्या माध्यमातून ४ ते ५ मेगावॅट वीज निर्मित करण्याचा आमचा प्रयास आहे. मार्च २०१६ अखेर हा प्रकल्प पूर्ण करायचा आहे. शनिवारवाडा येथील नवीन लाईट ॲण्ड साऊंड शो चे पूनर्निर्माण व सुशोभिकरण करण्याचे काम येत्या काही दिवसांमध्ये पूर्ण करून शहराला याचे लोकापर्ण करायचे आहे. ऊर्जा बचतीचे दृष्टिकोनातून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात विविध प्रकारच्या सुमारे ५५०० एल.ई.डी. फिटिंग्ज लावण्यात आलेल्या आहेत. तसेच सुमारे १३५० एल.ई.डी. फिटिंग्ज लावण्याचे काम सध्या चालू आहे. 'हिंदू ह्रदयसम्राटश्री.बाळासाहेब ठाकरे व्यंगचित्रकार कलादालन' येथील काम मार्च २०१६ पूर्ण करण्याचा आपला मानस आहे. मनपा मुख्य भवन, नानावाडा आणि मंडई या हेरिटेजवास्तूंवर आऊटडोअर टाईप विशिष्ट प्रकारची आर्किटेक्चरल विद्युत लाईटिंग करणे हे काम काही प्रमाणात पूर्ण झालेले आहे आणि काही प्रमाणात काम प्रगतीपथावर आहे. सन २०१६-१७ मध्ये मनपाच्या इमारतींवर Roof Top Photo Voltaic Cell (RTPV) च्या माध्यमातून, सौरउर्जेच्या माध्यमातून ४ ते ५ मेगावॅट वीज निर्मित करण्याचा आपला प्रस्ताव आहे. हे केल्यानंतर महानगरपालिकेला वीजबीला पोटी लागणारा बोजा मोठ्या प्रमाणावर कमी करण्यास आपल्याला यश मिळणार आहे. शहरातील संपूर्ण दिवे एल.ई.डी.मध्ये परावर्तीत करून स्मार्ट स्ट्रीट लायटिंगकडे आपली वाटचाल करायची आहे. त्यासाठी टेंडर प्रक्रिया अंतिम टप्यामध्ये आलेली आहे. येत्या एप्रिल महिन्यापासून कामाची प्रत्यक्ष सुरूवात होईल, याची आपण तयारी करीत आहोत. शहरातील रस्त्यांवरील दिव्यांकरीता जी.आय.एस. सिस्टिम व मटेरिअल इन्व्हेटरी सिस्टिम बसविण्याचे प्रयत्न यावर्षी करणार आहोत. ऊर्जा बचतीसाठी अत्याधुनिक उपकरणे या बजेटमध्ये प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. मुख्य मनपा भवन व क्षेत्रिय कार्यालय येथे सी.सी.टी.व्ही.बसविण्याचे काम मागच्या वर्षी काही ठिकाणी पूर्ण करण्यात आले यावर्षी काही ठिकाणी पूर्ण करण्यात येणार आहे.

## आपत्ती व्यवस्थापन

आपत्ती व्यवस्थापनामध्ये आपल्याकडे प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र मनपामध्ये सुरू करणे आवश्यक आहे. ते आपण सुरू केलेले आहे. लोकांना अनेक प्रकारची प्रशिक्षणे, माहिती देण्याकरीता पुस्तके, अग्नीशमन यंत्रणा यावर्षी तयार केलेले आहे. या पुढच्या कालावधी मध्ये अशा प्रकारच्या कामांसाठी २.५० कोटी रू.ची तरतूद केलेली आहे. सर्च ॲण्ड रेस्क्यु मोबाईल व्हॅन आणि संपर्क यंत्रणा निर्मित करण्याचा आपला मोठा प्रयत्न असणार आहे.

## जे.एन.एन.यु.आर.एम.

यामध्ये सध्या दोन प्रोजेक्ट सुरू आहेत आणि अमृत योजनेबद्दलची माहिती या पुढील स्लाईड मध्ये आहे. वाढीव कालावधी म्हणजे ट्रान्झक्शेन फेज मध्ये जे.एन.एन.यु.आर.एम. मंजूर झालेल्या प्रकल्पांसाठी उत्पन्नाच्या हिश्यमध्ये ८७ कोटी यावर्षी आपल्याला मार्च पूर्वी प्राप्त होणार आहे. भामा आसखेड व वडगाव बुद्रुक जल शुध्दीकरण केंद्र याचे काम जे.एन.एन.यु.आर.एम. ट्रान्झक्शेन फेज मधील हे काम सुरू आहे. दि.१४/८/२०१५ च्या परिपत्रकाप्रमाणे मार्च २०१५ च्या अगोदर वितरीत प्रकल्पांचा मंजूर निधी, जे मार्च २०१४ वितरीत झालेला आहे. त्यांचाच समावेश अमृत अभियानामध्ये करण्यात आलेला आहे. यामध्ये भामा आसखेड व वडगाव बुद्रुक जल शुध्दीकरण केंद्र या दोन्हींचा समावेश झालेला आहे.

## स्मार्ट सिटी अभियान

स्मार्ट सिटी अंतर्गत यावर्षी दि.२५/६/२०१५ रोजी स्मार्ट सिटी अभियानाचा शुभारंभ झाला. २९३२ कोटी रू.चा आराखडा यावर्षी डिसेंबर १५ मध्ये आपण केंद्र शासनाला सादर केलेला आहे. येत्या दोन चार दिवसांमध्ये याबद्दल अंतिम निर्णय आपल्याला कळणार आहे. त्यानुसार या आराखड्याची अंमलबजावणी आपल्याला शहरात यावर्षापासून करायची आहे.

## अमृत अभियान

आपण आपले एस.एल.आय.पी. म्हणजे सेवापातळी सुधारणा प्लॅन तयार करून राज्य सरकारला सादर केलेला आहे. आपल्या एस.एल.आय.पी.मध्ये ९३५ कोटी पाणी पुरवठ्यासाठी व मल:निसारणासाठी ४२३ कोटी रू.ची तरतूद करण्यात आलेली आहे आणि एस.एल.आय.पी.मंजूर झाल्यानंतर येत्या २०१६-१७ पासून अमृत या योजनेपासून आपल्याला पैसे मिळण्यास सुरूवात होईल. साधारणत: पुढच्या वर्षी अमृत मध्ये आपल्याला र.रु.५०.०० कोटी प्राप्त होतील, याची तरतूद आपण बजेट मध्ये केलेली आहे. स्मार्टसिटी अंतर्गत २०० कोटी आणि अमृत अंतर्गत ५० कोटी असे २५० कोटी रू.खर्च करण्याचा आमचा मानस आहे. सन २०१६-१७ मध्ये नवीन वाढीव कालातंर्गत असलेले व आता अमृत अभियानामध्ये पात्र ठरलेल्या पाणी पुरवठा योजनांसाठी १८५ कोटी तरतूद प्रस्तावित आहे. या प्रकल्पांसाठी केंद्र शासनाचा हिस्सा १७४ कोटी असणार आहे. भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. वडगाव बुद्रुकजलशुध्दीकरण केंद्र येत्या ६ महिन्यात पूर्ण करायचे आहे. ज्या प्रकल्पांची कामे अद्याप शिल्लक आहेत त्यासाठी ५९ कोटी रू.ची तरतूद यावर्षी प्रस्तावित आहे. स्मार्टसिटी आणि अमृतसाठी २०० आणि ५० असे २५० कोटी रू.ची तरतूद यावर्षीच्या बजेटमध्ये केली आहे.

## भवन रचना

सारसबाग येथील हिंदू हृदयसम्राट श्री.बाळासाहेब ठाकरे व्यंगचित्रकार कलादालन, बाबुराव सणस स्पोर्टस् होस्टेल व स्पोर्टस् गॅलरी, सिंहगड रस्ता येथील वीर बाजी पासलकर स्मारक, हडपसर येथील रामचंद्र बनकर क्रीडा संकुल, सन २०१५–१६ मध्ये पुणे महानगरपालिका मुख्य भवनाच्या विस्तारित इमारतीचे काम सुरू केले. वैकुंठ स्मशानभूमी येथे सुशोभीकरणाचे काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. गाडीखाना येथील मालती काची प्रसूतिगृहाचे काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. येरवडा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक हॉलचे काम येरवडा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक हॉलचे काम पूर्ण करणेत येणार आहे. भवानी पेठ येथील सोनावणे हॉस्पिटल प्रसूतिगृहाकरिता अद्ययावत इमारत बांधणेचे काम प्रगतीपथावर आहे आणि गणेश पेठ येथे मासळी मार्केटचे नूतनीकरण करणेचे काम सुध्दा प्रगतीपथावर आहे.

सन २०१६–१७ मध्ये भवन खात्यासाठी प्रामुख्याने सुरू असलेली कामे पूर्ण करण्याकरीता १२०.७८ कोटी रू.ची तरतूद केली आहे. काही प्रमुख प्रोजेक्टस पूर्ण करण्याचा मानस आहे. पुणे मनपा भवन येथील विस्तारित इमारतीचे काम १०० टक्के पूर्ण करून डिसेंबर पर्यंत लोकार्पण करण्याचा आणि यासाठी लागणारा संपूर्ण निधी यावर्षीच्या बजेट मध्ये घेण्यात आलेला आहे. विविध खात्यांकडील रेकॉर्ड जतन करण्याकरीता महानगरपालिकेची एक मोठी अडचण सध्या आहे. त्यासाठी परिपूर्ण जागा नाही. नायडू हॉस्पीटलच्या आवारामध्ये बांधकाम पूर्ण करण्याकरीता लागणारा सर्व निधी यावर्षीच्या बजेट मध्ये घेण्यात आलेला आहे. जेणेकरून तो एक महत्वाचा विषय मार्गी लागेल. घोले रोड व औंध, बिबवेवाडी, नगररोड येथे प्रशासकीय कामकाजासाठी क्षेत्रीय कार्यालयासाठी नवीन इमारत बांधकाम पूर्ण करण्याचा आपला मानस आहे. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह कोथरूड येथे नवीन बालनाट्यगृह उभारण्याचे काम हाती घ्यायचे आहे. पुणे शहरात कामगार कल्याण केंद्र उभारण्याचे काम हाती घ्यायचे आहे. हिराबाग कोठीचे व्यापारी आरक्षित जागेवर स्व.वसंतदादा पाटील यांचे नावावर मनपा सेवक प्रशिक्षण हॉल, बांधण्याची तरतूद यावर्षीच्या बजेट मध्ये करण्यात आलेली आहे.

<u>पी.एम.पी.एल.</u>

पी.एम.पी.एल.साठी यावर्षी २०७ कोटी ची तरतूद करण्यात आलेली आहे यामध्ये संचलन तूट, इ. ५ ते १० वी विद्यार्थी पासेस, अंध अपंग पासेस, विविध सवलतीचे पासेस व पीएमपीएमएल कामगारांच्या ५६ महिन्याच्या वेतन आयोग फरक याचा समावेश आहे.

<u>माहिती व तंत्रज्ञान</u>

सन २०१५–१६ मध्ये माहिती व तंत्रज्ञान विभागाला सर्वात महत्वाचे जे काम हाती घेतले होते ते महानगरपालिकेचा स्मार्ट गर्व्हनन्सचे काम, ३ वर्षाचा आराखडा तयार करण्याचे काम हाती घेतले होते. त्यामध्ये आपण यशस्वी झालो आणि मला आपल्या सगळयांना सांगायला आनंद होतो की, punesmart.gov.in असे संकेतस्थळ सुरू करण्यात आले आणि या संकेत स्थळावर येत्या ३ वर्षामध्ये ई–गर्व्हनन्स आणि स्मार्ट गर्व्हनन्सच्या माध्यमाने पुणे महानगरपालिका नागरीकांसाठी कोणकोणत्या सवलती, कोणकोणत्या सुविधा देणार आहे? त्याचा संपूर्ण लेखा जोखा या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. लोकसंवादासाठी महानगरपालिकेकडे येणाऱ्या तक्रारी, सूचना, मते यासाठी लोकांना योग्य प्रतिसाद मिळावा यासाठी “Feedback Monitoring Cell (FMC)” स्वतंत्र ११ लोकांचा कक्ष, फक्त यासाठी सुरू करण्यात आलेला आहे. याचा अत्यंत चांगला प्रतिसाद नागरीकांकडून प्राप्त होण्यास सुरूवात झाली आहे आणि याची संपूर्ण माहिती आपल्याला स्मार्ट गर्व्हनन्सवर सुध्दा दररोज उपलब्ध होणार आहे. “Feedback Monitoring Cell (FMC)” हे आपल्या सर्व प्रकारच्या सोशल मिडीयाचा वापर याठिकाणी सुरू आहे. नागरीकांमार्फत Facebook, Whatsapp, Website, Social Media, Twitter, Instagram, SMS इ. विविध माध्यमांद्वारे Centralised पध्दतीने तक्रारी व सुचना प्राप्त होवून कार्यवाही करण्याकरीता FMC द्वारे अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे आणि अनेक लोकांशी आपण लोकसंवाद साधत आहोत. विविध विभागांच्या प्रकल्पांची माहिती व प्रशासकीय निर्णय नागरीकांपर्यंत पोहचण्याकरीता हे FMC उपयोगी ठरत आहे. मागील वर्षी मे महिन्यामध्ये आपण फेसबुकचे नवीन पेज सुरू केले, यांचे लोकांनी प्रचंड उत्साहाने स्वागत केले आहे आणि या पेजला अनेक लाईक्स प्राप्त झाल्या आहेत. स्मार्ट सिटि प्रकल्पांतर्गत नागरिकांच्या सहभागाकरिता www.punesmartcity.in संकेतस्थळ सुरू करण्यात आले. याबाबत सांगायला आनंद होत आहे की, सर्व महानगरपालिकांसाठी सुरू असलेले माय जॉब्ज इन चा जो पोर्टल होता, त्या एकटया पुणे स्मार्टसिटी डॉट इन वर सर्व महानगरपालिकांच्या पोर्टल पेक्षा जास्त हिटस प्राप्त झाले, हे आपल्याला गौरवाने सांगायला अभिमान वाटतो. या संकेत स्थळाला आजही नागरीकांचा भरपूर चांगला प्रतिसाद मिळत आहे, आजही मिळत आहे आणि उद्या यामध्ये शहरासाठी एक व्हिजन कम्युनिटी तयार करण्याचा एक मानस आहे. यामध्ये दीर्घ काळापर्यंत लोकांशी संवाद कसा साधता येईल? लोकांची मते कशी प्राप्त करता येतील? त्यांच्या मतांप्रमाणे, त्यांच्या ओपिनियन प्रमाणे आपल्या कामकाजात सुधार कसा करता येईल? याबाबत या वेबसाईटच्या माध्यमाने यश प्राप्त होणार आहे. नागरिकांना राजीव गांधी उद्यानाची तिकिटे ऑनलाईन देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली. या पुढच्या कालावधी मध्ये पुणेसिटीचे एक पोर्टल तयार करण्याचे काम आपण हाती घेतले आहे. त्या माध्यमाने आपली सर्व कला दालने, सर्व तिकीटे देण्याचे काम ऑनलाईन होईल, कोणालाही तिकीट खिडकीवर जाण्याची आवश्यकता पडणार नाही, अशी तरतूद मार्च २०१६ पर्यंत करण्याचा आमचा मानस आहे. यावर्षी स्मार्ट गर्व्हनन्सचा जो ३ वर्षाचा आराखडा आहे. तो पूर्ण करण्याकरीता यावर्षी ४० कोटी रू.ची तरतूद आहे. शहरात आपण २०२० पर्यंत, पुण्यात आपण सर्व कुटूंबांमध्ये किमान एक व्यक्ती संगणक साक्षर व्हावा, यासाठी आपण नियोजन केलेले आहे आणि २०२० पर्यंत हे नियोजन पूर्ण करायचे असेल तर जवळपास ३.५० लाख कुटूंबांमध्ये किमान व्यक्तीला संगणक साक्षर करणे आवश्यक आहे. यासाठी नॅशनल डिजीटल मिशनच्या अनुषंगाने शहरामध्ये नवीन ३० Digital Literacy Centers सुरू करण्यासाठी तरतूद बजेट मध्ये केलेली आहे. नागरीसुविधा केंद्राचे बळकटीकरण करून कुठल्याही माणसाला त्याच्या घराजवळ दोन कि.मी. च्या परिसरामध्ये नागरी सुविधा

केंद्र उपलब्ध होईल याची व्यवस्था केलेली आहे. विविध कामांची माहिती होण्याकरीता व तक्रारींची नोंद घेण्याकरीता आपल्या महानगरपालिकेमध्ये मार्च २०१६ पर्यंत कॉल सेंटर सुरू करण्याचा आमचा मानस आहे.

नागरिकांना “Right to Services act” आता सुरू झालेला आहे आणि त्याप्रमाणे ज्या १५ सुविधा आहेत. जन्मप्रमाणपत्र देणे, मृत्यू प्रमाणपत्र देणे, विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे, मालमत्ता कर उतारा देणे, थकबाकी नसल्याचा दाखला देणे, दस्तावेजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे, वारसहक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे, झोन दाखला देणे, भाग नकाशे देणे, बांधकाम परवाना देणे, जोते प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र देणे, नळ जोडणी देणे, जलनिसा:रण जोडणी देणे, अग्निशमन ना हरकत दाखला देणे व अग्निशमन अंतिम ना हरकत दाखला देणे. या १५ सेवा, दि.२६ जानेवारी २०१६ पासून म्हणजे उद्यापासून आपल्या शहरातील नागरीकांना ऑनलाईन उपलब्ध होणार आहे आणि यासाठी आपली पूर्ण तयारी झालेली आहे. आज ४.०० वाजल्यापासून आपली ही वेबसाईट खुली होईल आणि या १५ सेवा नागरीकांना ऑन लाईन उपलब्ध करून देणार आहोत आणि यामध्ये झालेल्या विलंबाबद्दल त्या अधिकाऱ्यांना त्या कायद्याने जबाबदार धरता येईल, अशा प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे. Cloud Technology चा वापर करून डाटा सेंटर' विकसित करून त्यावर प्रोजेक्ट, यावर्षी बजेट मध्ये घेतलेले आहे. GIS संगणकप्रणाली कार्यान्वित करून विविध विभागांचे डाटाबेस इंटिग्रेट करण्याचा प्रकल्प यावर्षी हाती घेतला आहे. ऑन लाईन फाईल ट्रकिंगबाबत ह्यावर्षी आपण संगणक प्रणाली विकसीत करणार आहोत. मनपा मुख्य भवन व इतर कार्यालयामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नेटवर्क सिस्टीम व इन्फ्रास्ट्रक्चर उभारणे प्रस्तावित आहे. महानगरपालिकेच्या नागरी सुविधा नागरिकांना घराजवळ उपलब्ध करून देण्यासाठी नागरी सुविधा केंद्र मदत करतात. आजच्या अस्तित्वात असलेल्या नागरी सुविधा केंद्रांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. यावर्षी प्रत्येक नागरिकाला त्याच्या घराजवळ दोन कि.मी. च्या परिसरामध्ये नागरी सुविधा केंद्र उपलब्ध असावे व त्यासाठी जुन्या सुविधा केंद्रांची दुरूस्ती व नवीन सुविधा केंद्र आवश्यक त्या प्रमाणात बांधण्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. पर्यटक आकर्षित करण्यासाठी आपण ह्यावर्षी पुणे सिटी पोर्टल ह्यावर्षी निर्मित करणार आहोत. एम गर्व्हनन्सच्या आधारावर जवळजवळ ५० विविध प्रकारचे मोबाईल ॲप्स यावर्षी आपण तयार करणार आहोत. पुणे मनपाचे संकेत स्थळ अद्यावत करण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे आणि येत्या आर्थिक वर्षामध्ये पूर्ण करणार आहोत. डिजीटल लिटरसी सेंटर्स कार्यान्वित करण्याचा उल्लेख केला आहे. मनपा अधिकारी व कर्मचारी सर्व वर्ग १ ते ४ कर्मचाऱ्यांना डिजीटली साक्षर होता यावे, यासाठी मनपामध्ये भव्य असे डिजीटल ट्रेनिंग लॅब, आपण कार्यान्वित करणार आहोत. नॅसकॉम फौडेशन सोबत यासाठी करार करून त्यांचे एक्सपर्टस आणि आपले व्यवस्थापन आणि आपले इन्फ्रास्ट्रक्चर अशी सांगड घालून हे डिजीटल ट्रेनिंग लॅब मनपा मध्ये सुरू करणार आहोत.

## हेरिटेज सेल

हेरिटेज सेल च्या माध्यमाने सन २०१५-१६ मध्ये अनेक कामे सुरू करण्यात आली. परंतु काही निधी अभावी काही कामे अर्धवट राहिली आहेत. ती पुढच्या वर्षी पूर्ण करणे आणि नव्याने काही कामे घेण्याचा मानस आहे. यावर्षी एक विशेष उपलब्धी होती. पुण्याची कॉफी टेबल बुक महानगरपालिकेने सुरू केली. आमच्या माहितीप्रमाणे कुठल्याही महानगरपालिकेने तयार केलेली ही अशी पहिली कॉफी टेबल बुक होती. त्यावर लोकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि ज्यांनी ज्यांनी ती पुस्तिका बघितली त्यांनी आर्वजून त्याचे कौतुक केले आणि अत्यंत चांगली पुस्तिका असल्याचे वर्णन केलेले आहे. ती पुस्तिका त्याच्या नवीन प्रिंटस काढून ह्यावर्षी आणखी जास्त लोकांपर्यंत पुण्याचे ब्रॅडिंग करण्याकरीता आपण पाठवू, याबाबत आपण विचार करीत आहोत. पुण्याचा टुरिझम मास्टर प्लॅनिंग करण्याचे काम हाती घेतलेले आहे. पुढच्या वर्षी ते पूर्ण करण्याचा आमचा मानस आहे. हरिटेजला दरवर्षी ३ ते ५ कोटी रू.चे बजेट असायचे यावर्षी आपण हरिटेज सेलला १५ कोटीचे बजेट दिलेले आहे आणि ह्या माध्यमाने पर्यटन व हेरिटेज यामध्ये मोठ्या प्रमाणावर काम करण्याचा आपला प्रयत्न असणार आहे. हेरिटेज व्हिलेज पार्क याची उभारणी करणे, पायाभूत सुविधा, मार्केटींग व विविध विकास कामे करणे, टुरिझम मास्टर प्लॅन तयार करणे, नानावाड्याचा फ्रीडम फायटर म्युझियम पूर्ण करणे, जुन्या पुणे शहराचे मिनिएचर मॉडेल तयार करणे इ.अशी कामे आपण यावर्षी हरिटेज सेलच्या माध्यमातून करणार आहोत.

## शिक्षण मंडळ

शिक्षणासाठी अनेक चांगले उपक्रम आपण सन २०१५-१६ हाती घेतले नॅसकॉम फाऊंडेशन सोबत डिजिटल साक्षरतेसाठी ३० शाळांमध्ये प्रकल्प सुरू होत आहेत. झेन्सार फाऊंडेशन तर्फे नवीन पाच शाळा दत्तक घेवून पर्सिस्टंट फाऊंडेशन यांच्या सोबत १०१ शाळांमधून नवीन १०१ स्वच्छतागृहांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. थरमॅक्स फ़ाऊंडेशन तर्फे चार शाळा दत्तक घेवून याशिवाय आपण पुढच्या वर्षी ३२५.६८ कोटी रू.चे प्रस्तावित बजेट मा.महासभेकडे प्रस्तावित केले आहे आणि त्याचे यामध्ये थोडक्यात वर्णन आहे. त्यावर ऑलरेडी चर्चा झाल्यामुळे त्यावर मी जास्त भर न देता पुढच्या स्लाईडकडे वळतो.

## कामगार कल्याण

सन २०१६-१७ मध्ये आपण कामगार प्रशिक्षणवर विशेष भर देणार आहोत. मराठी भाषा संवर्धन समितीचे कामकाज आणखी बळकट करण्याचा प्रयत्न होणार आहे.

## सुरक्षा विभाग

सुरक्षा विभागामार्फत नवीन योजना राबविण्याचा आपला मानस आहे.इमारती मध्ये येणाऱ्या नागरीकांसाठी मॅकेनाईज्ड इनबिल्ट कॅमेरा संगणकांस जोडण्याची प्रणाली कार्यान्वित करण्याचा आपला मानस आहे.

## अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन

अतिक्रमण विभागामार्फत मागील वर्षामध्ये दैनंदिन अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई, अधिकृत व्यवसायिकांचे पुर्नवसन व फेरीवाला धोरणांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यापुढील वर्षामध्ये फेरीवाला धोरणाच्या आधारे परवानाधारक फेरीवाल्यांचे पुर्नवसनावर आपण विशेष भर देणार आहोत. पुणे शहरातील जास्त रहदारीचे मुख्य ४५ रस्ते व रहदारीचे १५३ चौक अतिक्रमणे मुक्त करावयाची आहेत. चार विभागीय कार्यालय स्तरावर नव्याने ''अतिक्रमण निर्मूलन कक्षाची'' स्थापना व त्या अंतर्गत फेरीवाल्यांचे पुनर्वसन कक्ष सुध्दा आपल्याला कार्यान्वित करावयाचा आहे. शहरामध्ये फेरीवाल्यांसाठी विविध ठिकाणी ओटा मार्केट बांधण्याचे यावर्षीच्या बजेट मध्ये प्रस्तावित केलेले आहे. तसेच कारवाईत जप्त केलेल्या साहित्याला टॅगिंग करणे व गोडाऊनमध्ये सी.सी.टीव्ही कॅमेरा बसविणे यासाठी यावर्षीच्या बजेटमध्ये तरतूद केलेली आहे.

**<u>अग्निशमन दल</u>**

अग्निशमन दल सन २०१६-१७ मध्ये रक्कम रूपये २६.३२ कोटी तरतुद केली आहे. त्यात नव्याने ४ अग्निशमन केंद्र बांधण्याचे प्रस्तावित आहे.

## सामान्य प्रशासन

सामान्य प्रशासन खात्यातर्फे सन २०१५-१६ मध्ये जी विशिष्ट कामे करण्यात आली त्याचा उल्लेख या स्लाईड मध्ये आहे. अधिकार सुपूर्तीसाठी महापालिका अधिकाऱ्यांना आजपर्यंत कोणकोणते अधिकार सुपूर्द करण्यात आले, याची पुस्तिका तयार करण्यात आली. ती आपल्या वेबसाईटवर सुध्दा आहे आणि ती पुस्तिका सर्व सन्माननीय नगरसेवकांना आणि अधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. कंत्राटी कामगारांबद्दल धोरण ठरविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. येत्या महिनाभरामध्ये कंत्राटी कामगाराबद्दल स्पष्ट धोरण महानगरपालिकेमार्फत ठरविण्याचे काम पूर्ण करण्यात येईल. राज्य शासनाच्या नियमाप्रमाणे सेवाप्रवेश नियमावलीची अंमलबजावणी सुरू करण्यात आलेली आहे. यावर्षी ३९ कर्मचाऱ्यांची सरळ सेवा व २५३ अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदोन्नतीचे काम पूर्ण करण्यात आले. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अन्वये महानगरपालिकेने अधिसूचीत केलेल्या १५ सेवा आपले सरकार पोर्टलला जोडून ऑनलाईन, उद्यापासून सुरू करणार आहोत. यावर्षी इंटिग्रेटेड ह्युमन रिर्सोसेस सिस्टीम कार्यान्वित करण्यासाठी आपण तरतूद केलेली आहे. चांगल्या दर्जाच्या कंपन्यांकडून इंटिग्रेटेड ह्युमन रिर्सोसेस मॅनेजमेंट सॉफ्टवेअर आपल्याला प्राप्त करायचे आहे आणि आवश्यक त्याप्रमाणात मनुष्यबळ भरती करण्याचे सुध्दा यावर्षी आपला मोठा कार्यक्रम असणार आहे. पुढचे ३ वर्षे महानगरपालिकांसमोर अत्यंत मोठे प्रोजेक्ट पूर्ण करण्याचे आवाहन आहे यासाठी लागणारे इंजिनिअर्स, तांत्रिक मनुष्यबळ इ.यावर्षी भरतीप्रक्रियेच्या माध्यमातून घेणार आहोत आणि मोठ्या प्रमाणात मनुष्यबळामध्ये वाढ करून हे प्रोजेक्ट कसे आपल्याला योग्य पध्दतीने साध्य करता येतील? याची व्यवस्था आपण करणार आहोत. पुणे मनपाच्या आस्थपेनवरील वर्ग १ ते वर्ग ४ कर्मचाऱ्यांसाठी सेवा प्रवेशासाठी जोडलेल्या कागदपत्रांचे स्कॅनिंग व डेटा इंट्रीचे काम सुध्दा यावर्षी पूर्ण करणार आहोत. जेणेकरून ही एक मोठी समस्या पदोन्नती आणि इतर वेळी येते, ती दूर होणार आहे.सर्व अधिकारी व कर्मचारी हजेरी कोठ्यावरील कर्मचाऱ्यांकरीता लेट अस बॉयोमेट्रीक मशीन्स आपण बसविणार आहोत.

आता मी या बजेट मध्ये जे तीन फंडस या बजेटमध्ये प्रस्तावित केले त्याचा मी थोडक्यात तपशील देतो.

**शहरी पाणी पुरवठा निधी-** याच्या जमा बाजूमध्ये मीटरव्दारे करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्यामध्ये आपण जी वाढ सुचविली आहे. त्यात मिळणारे जे अतिरिक्त उत्पन्न आहे ते ॲटोमॅटीक ॲ-स्क्रो होऊन या अकौंट मध्ये जातील. जागतिक बँक, अन्य बँकाकडून दीर्घ व लघु मुदतीची जी कर्जे मिळतील ती सुध्दा या अकौंट मध्ये जातील. अमृत व स्मार्ट अभियानासाठी केंद्र व राज्य शासनाकडून जे अनुदान येणार आहे. ते या अकौंटमध्ये जाणार आहे. स्मार्टसिटीसाठी पाण्याचे जे अनुदान मिळणार आहे ते या अकौंट मध्ये जाणार आहे आणि यातून २०४७ च्या गरजेप्रमाणे पुणे समान पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणीचे काम हाती घेण्यात येईल म्हणजे स्वतंत्र अकौंट राहील आणि हे पैसे महापालिकांच्या इतर कुठल्याही कामांवर खर्च न करता फक्त २०४७ च्या पाण्याच्या योजनेसाठी खर्च करण्याचा आमचा मानस आहे. त्यासाठी स्वतंत्र अर्बन वॉटर फंड निर्मित करण्याचा प्रस्ताव या बजेटमध्ये आहे. यावर्षी अर्बन वॉटर फंड मध्ये २९० कोटी रू.ची तरतूद केलेली आहे.

**अर्बन ट्रान्सपोर्ट फंड-** या दोन समस्या, आपल्याला माहिती आहे की, स्मार्टसिटीच्या सिटीझन एंगेजमेंट मध्ये सर्वात जास्त याची चर्चा झाली होती. या दोन्ही स्वतंत्र निधी मिळावा आणि दरवर्षी कायमचा निधी या दोन्ही योजनांना मिळावा म्हणून हे दोन स्वतंत्र फंड आपण स्थापित करीत आहोत. या फंड मध्ये पथकर याऐवजी शासकीय सहाय, रस्ता खोदाईचे शुल्क जेवढे प्राप्त होणार आहे. त्याशिवाय अतिक्रमण परवाना शुल्क, अतिक्रमण कारवाई पोटी जमा होणारे शुल्क इ.हे सर्व अर्बन ट्रान्सपोर्ट फंड मध्ये जातील. शहरी वाहतूक निधी मध्ये ५१७ कोटी रू.ची तरतूद यावर्षी केलेली आहे. खर्च बाजूचा तपशील मेट्रो, बी.आर.टी., सायकल प्लॅन, उच्च दर्जाच्या पदपथांची निर्मिती व पी.एम.पी.एम.एल.मार्फत बसेस खरेदी, पथ व वाहतूक विभागाकडील भांडवली व महसूली कामांसाठी या अर्बन ट्रान्सपोर्ट फंडचा खर्च होणार आहे.

**शहरी पायाभूत निधी-** अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड म्हणून एक स्वतंत्र फंड आपल्या बजेट मध्ये क्रीऐट केलेला आहे. यामध्ये भूमी भाडे, भूमी विक्री, भवन भाडे यातून मिळणारे सर्व उत्पन्न, बांधकाम विभागाकडील परवानगी, अनुज्ञापत्र शुल्क, इ. प्रिमियम एफ.एस.आय., फंजिबल एफ.एस.आय. यातून येणारे सर्व उत्पन्न, त्या त्या भागामध्ये इन्फ्रास्ट्रक्चरचा विकास करण्याकरीता फक्त आणि फक्त त्यासाठी खर्च होईल. यासाठी खर्चाच्या बाजूला भवन, पथ, वाहतूक, पूल व नदी सुधारणा, विशेष प्रकल्पासाठी होणारा खर्च व क्षेत्रिय कार्यालयामार्फत करावयाची कामे व नागरी सहभागातून करावयाची कामे यासाठी या फंड मधून पैसे खर्च होतील. यासाठी तरतूद केलेली आहे. हे ३ स्वतंत्र फंड तयार करण्याचा मानस एवढ्या करीता आहे की, आपण ह्या कामांवर स्वतंत्र फोकस देऊ शकणार आणि हे पैसे इतरत्र न वापर होता या ३ महत्वाच्या कामांमध्ये वापर होतील. अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड यावर्षी ११९ कोटी रू.चा निर्मित केलेला आहे. हे ३ फंड अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड ९१९ कोटी , अर्बन ट्रान्सपोर्ट फंड ५१७

कोटी आणि अर्बन वॉटर फंड २९० कोटी रू. यावर्षापासून आपण बजेट मध्ये अंर्तभूत करीत आहोत. दरवर्षी यामध्ये निधी टाकण्याचा आणि निधी गोळा करण्याचा आमचा मानस आहे

**प्रमुख जमा बाबी**

सन २०१५–१६ मध्ये स्थानिक संस्था कराचे उद्दीष्ट – र.रू. १३९५.५८ कोटी होते. नवीन वर्षाचे मिळकतकराचे उदिष्ट १२०४ कोटी रू.होते. डिसेंबर अखेर ५६९ कोटी यामध्ये थोडेसे गणित समजणे आवश्यक आहे. १२०४ कोटी रू. हे पाण्याच्या मीटर दर धरून आहे. ५६९ कोटी यामध्ये इनक्लुड झालेले नाही जर इनक्लुड झाले तर प्रत्यक्ष जमा ७८८ कोटी पर्यंत जाते. म्हणजे १२०४ च्या अगेन्स्ट ७८८ बरोबर ही आपल्या डिसेंबर १५ ची उपलब्धी आहे. थकीत मिळकत करासाठी आपण जी अभय योजना जाहिर केली आहे. त्यातून १० दिवसांमध्ये ३३ कोटी रू.आपल्याला प्राप्त झाले आहेत आणि हे वाढत चालले आहे आणखी पुढच्या काही दिवसांमध्ये अजून निधी प्राप्त होण्याची शक्यता आहे. आपण यावर्षी काही सुधारणा केल्या. ई–मेल आणि भ्रमणध्वनीचा जास्तीत जास्त वापर करून लोकांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला. पोस्ट या खात्यासोबत करार करून आपण घरोघरी नोटीसा पाठविण्यामध्ये आपण यश प्राप्त करू शकलो आणि आणि नोव्हेंबर २०१५ पासून ऑनलाईन ना–हरकत प्रमाणपत्रांसाठी आलेल्या ६२५ ई–मेल्सला, ऑनलाईन ६२५ ना–हरकत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही आपण केलेली आहे. ही कार्यवाही आता आपल्याकडे कायमस्वरूपी सुरू झालेली आहे.

**बांधकाम परवानगी व विकास शुल्क**

सन २०१५–१६मध्ये बांधकाम परवानगी व विकास शुल्कचे ७५१ कोटी उद्दिष्ट प्रस्तावित होते आणि डिसेंबर अखेर ५७५ कोटी झालेले आहे मार्च अखेर ८०० कोटी रू.पर्यंत जाण्याचा आपला प्रयत्न आहे.

**पाणीपट्टी**

पाणीपट्टी उदिष्ट ८० कोटी होते त्यापैकी ४२ कोटी रू.प्राप्त झालेले आहेत आणि यावर्षी हे ९० कोटी पर्यंत नेण्याचा आपला मानस आहे.

**आकाश चिन्ह परवाना**

जाहिरात फलकाव्दारे २४ कोटी निधी माहे डिसेंबर अखेर वसूल झालेला आहे. परमिट व परवाना फॉर्म विक्री पोटी ६० लक्ष आणि शहरातील जेवढे जाहिरात फलक आहेत त्यांना आपण सांकेतिक क्रमांक देऊन ही माहिती पुणे मनपाच्या वेबसाईडवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

आपण जर २०१५–१६ चे अंदाजपत्रक दृष्टीक्षेपात बघितले तर तर १५–१६ चे जमेचे उदिष्ट एकूण ४४७९ कोटी रू. होते. डिसेंबर २०१५ अखेर २९३८ कोटी पर्यत जमा प्राप्त करण्यात आपण यशस्वी झालो आहोत. येत्या ३ महिन्यांमध्ये आपल्याला हे उदिष्ट पूर्ण करायचे आहे.

सन २०१६–१७ या आर्थिक वर्षाच्या जमाखर्चाचा अंदाज पुढीलप्रमाणे सादर करण्यात येतआहे.

(आकडे रूपये कोटीत)

| जमा बाजू | | खर्च बाजू | |
|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | ०.०२ | सेवकवर्ग खर्च | १०८६.०० |
| स्थानिक संस्था कर | १५५०.०० | प्राथमिक शिक्षण | ३३५.६८ |
| मिळकतकर | ९४८.७६ | वीज खर्च व दुरूस्ती | २१२.८४ |
| विकास शुल्क | ९३५.१० | पाणी खर्च | २८.०० |
| पाणीपट्टी | ३३८.४५ | कर्ज परतफेड, व्याज व घसारा | ७९.०२ |
| शासकीय अूदान | १९९.४० | औषधे, पेट्रोल/डिझेल | ८५.३८ |
| जनेराशपुअ,अमृत व स्मार्ट अनुदान | ३१६.५६ | देखभाल दुरूस्ती व इतर खर्च | ८७७.८७ |
| | | वॉर्डस्तरीय | ३२.४० |
| इतर जमा | ७८२.७१ | क्षेत्रीय कार्यालयाने करावयाची कामे (नॉन प्लॅन) | १२९.६६ |
| कर्ज | १२८.०० | | |
| | | भांडवली व विकासाची कामे | १८७४.०३ |
| | | जेएनएनयुआरएम, अमृत व स्मार्ट सिटी | ४५८.१० |
| | | वर्षाअखेरची शिल्लक | ०.०२ |
| एकूण | ५१९९.०० | एकूण | ५१९९.०० |

| अ.क्र. | स्त्रोत | रक्कम रु. कोटीत |
|---|---|---|
| १ | स्थानिक संस्था कर | १५५०.०० |
| २ | मालमत्ता कर | ९४८.७६ |
| ३ | अूदाने | ५१५.९६ |
| ४ | इतर बाबी | २१८४.२६ |

| | | |
|---|---|---|
| | एकूण | ५१९८.९८ |

| अ.क्र. | प्रस्तावित खर्च प्रामुख्याने | रक्कम रु. कोटीत |
|---|---|---|
| १ | महसूली खर्च | २८६६.८५ |
| २ | भांडवली खर्च | २३३२.१३ |
| | एकूण | ५१९८.९८ |

अंदाजपत्रकामध्ये ५१९९ कोटी रू.येणार आहेत त्यातील ३० टक्के स्था.संस्था करामधून येतील, १८ टक्के मिळकत कर आणि १८ टक्के शहर विकास चार्जेस यामधून येणार आहे. इतर जमेच्या माध्यमाने १५ टक्के, जे.एन.एन.यु.आर.एम., अमृत आणि स्मार्टसिटीच्या माध्यमातून ६ टक्के, शासकीय अनुदान ४ टक्के आणि पाणीपट्टीच्या माध्यमाने ७ टक्के, कर्जाच्या माध्यमातून २ टक्के, असे हे स्वरूप असणार आहे.आपण जर खर्चाचे चित्र पाहिले तर विकासाची कामे व प्रकल्प ३८ टक्के,जे.एन.एन.यु.आर.एम., अमृत आणि स्मार्टसिटी साठी १० टक्के, सेवकवर्ग २३ टक्के, घसारा, पेट्रोल इतर खर्च १९ टक्के, वीज खर्च ४ टक्के, पाणी खर्च १ टक्का, क्षेत्रिय कार्यालयाने करावयाची कामे २ टक्के, वॉर्डस्तरीय कामे १ टक्का व कर्ज परतफेड व व्याजासाठी १ टक्का निधी आपला खर्च होणार आहे.

स्थानिक संस्था कर चे उदिष्ट १५५०.०० कोटी रू. ठेवले आहे यावर्षी १४०० कोटी रू.च्या वर जाण्याचा आपला मानस आहे आणि यामध्ये ८ टक्के वाढ धरून १५५० कोटी रू.चे उदिष्ट पुढील वर्षासाठी ठेवण्यात आलेले आहे.

मिळकत करासाठी पुढच्या वर्षी पाण्याच्या दरवाढीसह ११९४.९१ कोटी रू.चे उदिष्ट ठेवले आहे. सवलतीच्या दराने मिळकत कर भरण्याचा कालावधी १ महिन्यांच्या पुढे वाढवून जून २०१६ पर्यंत करण्याचे आपण ह्यावर्षी प्रस्तावित करीत आहोत. दरवर्षी हे मे महिन्यापर्यंत असते. पुणे शहरातील मिळकतींना घर नंबर देण्याबाबतची यंत्रणा यावर्षी कार्यान्वित करणार आहोत. महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्यानुसार मालमत्ता आकारणी उतारा व नाव हस्तांतरण सुविधा २६ जानेवारी २०१६ पासून ऑन लाईन उपलब्ध करून देण्यात येईल. पोस्टाच्या सुमारे ९० शाखांमधून मिळकत कर वसूलीचे काम यावर्षी सुरू करणार आहोत. जी.आय.एस.व्दारे मिळकतींचे सर्व्हेक्षण करण्याचे टेंडर प्रक्रिया चालू आहे आणि त्या माध्यमाने पुढच्या वर्षी आपण मिळकत करामध्ये वाढ करण्याचा प्रयत्न करणार आहोत. करपात्र रक्कमेच्या, पाणीपट्टी दरामध्ये वार्षिक वाढ, नवीन पाणीपट्टी धोरण त्यामुळे पाणीपट्टी मध्ये सुमारे ९५ कोटी रू.ची वाढ अपेक्षित आहे आणि ही वाढ फक्त २४ बाय ७ समान पाणी वाटप योजनेसाठी नवीन तयार केलेल्या अकौंट मध्ये एसस्क्रो करून ठेवण्याचा आमचा मानस आहे. जेणेकरून हे पैसे फक्त त्या योजनेवर खर्च होऊ शकतील.

बांधकाम परवानगी आणि विकास शुल्क माध्यमातून सन २०१६-१७ मध्ये ९३५.१० लक्षाचे उदिष्ट समोर ठेवलेले आहे. दरवर्षी आपण पाहतो की, बांधकाम या क्षेत्रामध्ये कधी मंदी असते तर कधी तेजी असते त्यामुळे आपल्याला जेवढे पाहिजे तेवढा निधी जमा होत नाही. परंतु यावर्षी मला सांगायला आनंद होतो की, बांधकाम खात्यामार्फत ८०० कोटी पर्यंत, पूर्वी कधीही घडलेले नाही एवढा निधी, एवढे शुल्क आपण गोळा करण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि ह्यावर्षी ८०० कोटी पर्यंत जाणार आहोत आणि पुढच्या वर्षी निश्चितच प्रिमियम आणि फंजेबल एफ.एस.आय.च्या माध्यमातून जे आपल्या डी.सी.रूल्स मध्ये प्रस्तावित आहे. ९३५.१७ कोटी, १० कोटीचा आकडा गाठणे शक्य होणार आहे.

पाणीपट्टी मध्ये ह्यावर्षी नवीन पाणीपट्टी धोरण प्रस्तावित केल्यानुसार व मिळकत करामध्ये आपण जी वाढ सुचविली आहे. त्यानुसार ३३८.४५ कोटीचे लक्ष्य आपण समोर ठेवले आहे. मला सर्वांना नम्रपणे विनंती करायची आहे की, याला वेगळया अशा दरवाढीच्या स्वरूपात न पाहता याला आपल्या नवीन समान पाणी वाटप योजनेसाठी लागणारे पैसे आणि यासाठी आपण स्वतंत्र अकौंट उभे करीत आहोत. त्यामध्ये हे सगळे पैसे जाणार आहेत. त्यामुळे पुण्यामध्ये २४ बाय ७ पाणी पुरवठा करणे. योग्य आणि समतोल पाणी पुरवठा करणे आपल्याला शक्य होणार आहे. त्या प्रोजेक्टसाठी हे पैसे वापरले जाणार आहेत.

आकाशचिन्ह परवाना विभाग, आता पर्यंत या विभागामार्फत आपण जी तरतूद करीत होतो. त्यामधून असे लक्षात येते की, आपण अनेक काही गोष्टी साध्य करू शकतो. त्याचा अंतर्भाव होत नव्हता यावर्षी पी.पी.पी.माध्यमाने आपण स्ट्रीट फर्निचरचा प्रोजेक्ट असेल किंवा जाहिरातीच्या माध्यमातून उत्पन्न प्राप्त करण्याचा प्रयत्न असेल. या सगळयांचा आपण सखोल अभ्यास केल्यानंतर किमान १०० कोटीचे उदिष्ट पार पाडण्याचे नियोजन यावर्षी केलेले आहे.

या ठळक बाबी ५१९९ कोटी रू.आपण यावर्षी अंदाजपत्रकात घेतलेल्या आहेत आणि मला विश्वास आहे की, माझे सहकारी आणि आपण सगळे मिळून हे उदिष्ट साध्य करण्यास यशस्वी होणार आहोत. काही बाबींमध्ये धोरणात्मक सुधारणा करणे अत्यंत आवश्यक आहे आणि काही प्रशासकीय सुधारणा केल्याशिवाय हे बजेट साध्य करणे आपल्याला शक्य होणार नाही. त्यात सेफ्टी पेड्रीस्ट्रीयन पॉलिसी असेल, ग्रीन बिल्डींगसाठी केलेल्या तरतूदी असतील,पार्किंग पॉलिसी असेल, नवीन एच.आर.मॅनेजमेंट असेल, नवीन कर्मचारी/अधिकाऱ्यांची भरती असेल, नवीन डी.सी.रूल्स असतील. तिन्ही फंडसची स्थापना असेल, आपल्या स्ट्रेन्थिंग ॲक्टीव्हिटीसाठी गाईड लाईन्स असतील, अर्बन स्ट्रीट गाईड लाईन्स असतील अशा अनेक गाईडलाईन्स आपण ह्या वर्षी प्रस्तावित करणार आहोत, त्यांना मान्यता मिळाल्याशिवाय हे बजेट साध्य करणे शक्य होणार नाही. कॉर्पोरेट सेक्टर मधील सामाजिक जबाबदारीचा जो सहभाग आहे. आज अनेक कंपन्या सी.एस.आर.च्या माध्यमातून महापालिकेकडे काम करण्यासाठी पुढे येत आहेत याला फॅसिलिटेट करण्याकरिता पुणे सिटी कनेक्ट म्हणून सेक्शन २५ कंपनीज ॲक्ट अंतर्गत ही कंपनी स्थापित झालेली आहे आणि पुणे सिटी कनेक्ट आणि पुणे मनपा मध्ये नोव्हेंबर २०१५ मध्ये करार झालेला आहे. या कराराच्या अनुषंगाने १०० टक्के संगणकीय साक्षरता, शहरामध्ये स्वच्छ पुणे यासाठी जे प्रयत्न आहेत. सुविद्य पुणे प्रत्येकाला गुणवत्तापूर्ण सेक्शन देण्याचे प्रयत्न आहेत. लाईट हाऊस प्रकल्प आणि अव्दितीय पुणे, पुण्याची ओळख जागतिक पर्यटन केंद्र म्हणून निर्माण करण्याचे

हे जे प्रयत्न आहेत त्यासाठी सी.एस.आर.च्या माध्यमाने कामे करणे शक्य होणार आहे आणि येत्या काही दिवसांमध्ये पुढील वर्षाचा सी.एस.आर.प्लॅन सुध्दा तयार करून मार्च २०१६ पूर्वी एप्रिल ते मार्च २०१७ पर्यंत सी.एस.आर.च्या माध्यमाने आपण काय काय अचिव्ह करणार? याचा स्वतंत्र आराखडा, आपण तयार करणार आहोत.

सिटी ट्रान्सफॉरमेशन म्हणून एक कल्पना यावर्षी आपण अंमलात आणणार आहोत. पुणे मनपाच्या कामकाजाची व्याप्ती जर बघितली तर ती दिवसेदिवस वाढत चालली आहे. नागरीकांसोबत संवाद ठेवणे, त्यांच्या आलेल्या सूचना, त्यांच्या आलेल्या तक्रारींची दखल घेणे आणि शासनाकडून येणाऱ्या सूचना त्यांच्याकडून येणारे जे प्रोजेक्ट आहेत त्यांची योग्य अंमलबजावणी करणे. सर्व पूर्ण शहराला समतोल असा चांगल्या पध्दतीचा विकास उपलब्ध करून देणे. हे सगळे करण्याकरीता आपल्या शहरामध्ये एक स्वतंत्र सिटी ट्रान्सफॉरमेशन युनिट असावे, अशी संकल्पना आपण मांडली आहे. हे युनिट अत्यंत तज्ञ लोकांसह स्थापित करणार आहोत. या तज्ञाच्या मार्फत आपण आपल्या शहरामध्ये होणाऱ्या कामांवर, विशेष प्रकल्पांवर, विशेष लक्ष ठेवणे, मॉनिटरींग आणि इंव्हाल्यूशन करणे, नियोजन करणे, पॉलिसी पेपर्स तयार करणे, संशोधन करणे, पुर्नविलोकन ह्या बाबीचे जे विषय आहेत. ते हाताळले जाणार आहे. स्वयंसेवी संस्था, तज्ञ संशोधक, नीती रचनाकार, अर्बन प्लॅनर्स, यांच्या सहायाने हा कक्ष स्थापित केला जाणार आहे. याव्दारे पुणे सिटी कनेक्ट आणि इतर संस्थांचा सहभाग करून महानगरपालिकेच्या, महापालिका आयुक्तांच्या कार्यालयाशी निगडीत असा हा सिटी ट्रान्सफॉरमेशन युनिट राहील आणि सर्व प्रकल्पांना वेळेवर पूर्ण करण्याकरीता जे मॉनिटरींग इव्हॅल्यूशन लागतो. नागरीकांशी संवाद वेळेवर आणि योग्य पध्दतीने साधण्याकरीता जी कुशलता लागते ती सर्व या सिटी ट्रान्सफॉरमेशनच्या माध्यमाने महानगरपालिकेला प्राप्त होणार आहे.

शेवटी यावर्षी आपण एक नवीन अकौंट कनसेप्ट आपण बजेट मध्ये आणण्याचा प्रयत्न केला आहे, तो आहे वाईज इनडेक्स तयार करण्याचा शहराचा समतोल विकास करण्याचे ध्येय हे आपल्या अंदाजपत्रकातील प्रमुख ध्येय असते. वाईज wise म्हणजे ward infrastructure services and enviorment index. हे तयार करण्याचा प्रयत्न यावर्षी केलेला आहे. एकूण ६ श्रेणींमध्ये प्रभागाच्या भौगोलिक आणि लोकसंख्येची स्थिती, सार्वजनिक भवने, सुविधा, रस्ते, मलनि:सारण, घनकचरा व्यवस्थापन, विद्युत, यासाठी २३ निर्देशांक तयार करून त्या निर्देशांकावर आधारीत वाईज इन्डेक्स प्रत्येक प्रभागासाठी तयार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अनेक देशांमध्ये ही पध्दत अवलंबिली जाते. उदा.ब्राझील आहे, भारतामध्ये देखील केंद्र सरकार राज्यांना अनुदान देताना अशा पध्दतीचा वापर करते. कुठल्या राज्याला किती निधी द्यावा? यासाठी अशा इन्डेक्सचा वापर भारत सरकारमार्फत सुध्दा केला जातो. त्याचे ६ प्रमुख घटक आहेत. प्रभागाची सध्याची स्थिती, सार्वजनिक भवने व सुविधांची स्थिती त्यामध्ये अंगणवाड्या, शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी सुविधा केंद्र, विरंगुळा केंद्र, उद्यान, व्यायाम शाळा, रात्र निवारा इत्यादी म्हणजे त्याच्याशी संबंधीत जेवढे घटक आहेत त्याचा समावेश इंडेक्स करताना करण्यात आलेला आहे. रस्त्यांसाठी सुध्दा अशाच ४ बाबींचा यामध्ये विचार करण्यात आलेला आहे. मलनिसा:रण, घनकचरा व्यवस्थापन, पथदिवे, यांची सध्याची परिस्थिती लक्षात ठेवून त्या प्रभागाचा वाईज इंडेक्स तयार करण्यात आलेला आहे. त्याचे सूत्र दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. प्रभागाच्या निर्देशांकांची किंमत **= त्याचे भाग करून** लघुत्तम किंमत – लघुत्तम किंमत. आपण जर हे बघितले तर लक्षात येईल की, हे रिलेटीव्ह इनडेक्स आहे. हे अॅब्सुलेट इंन्डेक्स नाही. प्रभागाच्या एका दुसऱ्या प्रभागाशी कंम्पॅरिझम आहे म्हणजे आपण कुठलाही आदर्श प्रभाग घेऊन चाललो नाही. हा एक रिलेटीव्ह इन्डेक्स आहे. एक प्रभाग दुसऱ्या प्रभागाच्या परिस्थितीनुसार कुठे आहे? हे दाखविण्याचा प्रयत्न यामध्ये आहे आणि ह्या सुत्राप्रमाणे प्रत्येक प्रभागाला निर्देशांक आहेत ते शून्य ते एक मध्ये मिळतो. त्याप्रमाणे त्याचे निर्देशांक दिले जातात. आता ही संकल्पना कशी विकसीत केली. आपण National institute of Arbun affair जे दिल्ली मध्ये आहे त्यांच्या सोबत याबद्दल चर्चा केली, संकल्पना विकसीत केली. मनपाच्या कार्यालयामध्ये, क्षेत्रिय कार्यालयामध्ये असलेल्या माहितीचा आधार घेतला. प्रभागानुसार वाईजची माहितीचे संकलन आणि विश्लेषण केले. wise index तुलनात्मक निर्देशांक जितके अधिक, तितका प्रभाग तुलनेने अधिक विकसीत या प्रकारचा निर्देशांक आपण तयार केला आहे. प्रभाग समित्यांबरोबर चर्चा केली. निर्देशांकानुसार निधी विभाजन, वाटप करण्याचा उद्देश या बजेट मध्ये प्रस्तावित केलेला आहे. यामध्ये गुण देताना ६७ पर्सेन्ट गुण आपण प्रभागाच्या स्थितीला दिलेले आहेत. त्याचे जे फॅक्टस आहेत ज्या प्रभागामध्ये लोकसंख्या जास्त असेल तर त्या प्रभागाला जास्त निधी, ज्या प्रभागामध्ये झोपडपट्ट्यांची संख्या जास्त असेल तर त्या प्रभागाला जास्त निधी हे फॅक्चुअल सिच्युऐशनवर आहे आणि उर्वरित ३३ टक्के मूल्य विकसीत प्रभागाची सध्या जी परिस्थिती आहे. तिथे रस्त्यांची परिस्थिती कशी? तिथे अंगणवाड्याची परिस्थिती कशी? तिथे भवनांची परिस्थिती कशी? तिथे मलनि:सारणची परिस्थिती कशी? तिथे स्ट्रीट लाईटची परिस्थिती कशी? या सर्व २३ इंडीकेटर्सवर अभ्यास करून ३० टक्के गुण त्याला देण्यात आले आणि त्याप्रमाणे एकूण तरतूद १२९.६६ कोटी करण्यात आलेली आहे. त्या आधारावर जे प्रभाग विकसीत आहेत त्यांना कमी निधी आणि जे प्रभाग अविकसीत आहेत त्यांना जास्त निधी देण्याचा प्रयत्न यावर्षी बजेटमध्ये करण्यात आलेला आहे. हा आपल्या शहराचा मॅप आहे. आपण जर बघितले तर, डाव्या बाजूला जे डार्क प्रभाग आहेत ते आपल्या पॉईन्ट ८० ते १ एवढा त्यांचा निर्देशांक आहे, म्हणजेच ते विकसीत प्रभाग आहेत. जे लाईट ग्रीन रंगामधील प्रभाग आहेत. ते विकसनशील प्रभाग आहेत. पॉईन्ट ६७५ टू पॉईन्ट ८० असा त्यांचा वाईज निर्देशांक आहे आणि जे एकदम लाईट कलरला आहेत. ते अविकसीत प्रभाग म्हणून आहेत. ते पॉईन्ट ५५ ते पॉईन्ट ६७५ या वाईज इंडेक्स मध्ये बसलेले आहेत. वाईज इंडेक्सवर आधारवर प्रभाग निधी वाटप करताना जे अविकसीत प्रभाग आहेत त्यांना किमान २ कोटी व अधिक निधी देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. जे विकसनशील प्रभाग आहेत त्यांना दीड ते दोन कोटी अशा प्रकारे निधी देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे आणि जे विकसीत प्रभाग आहेत त्यांना दीड कोटी पर्यंत, हे कमाल दीड कोटी पर्यंत देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अशा प्रकारे हे या बजेटचे थोडक्यात स्वरूप आहे. शेवटी पूर्ण करण्यापूर्वी ज्या महत्वाच्या योजना या बजेट मध्ये घेतल्या आहेत त्याचा थोडक्यात तपशील देतो.

आपण समान पाणी पुरवठा योजनेला यावर्षी २९० कोटी रू.ची तरतूद केलेली आहे. शहराच्या पावसाळी गटार योजना राबविण्याकरीता यावर्षी ११७ कोटी रू.ची तरतूद केलेली आहे. मेट्रोसाठी ६० कोटी रू.ची तरतूद सुचविलेली आहे. राष्ट्रीय नदीसुधार योजनेतंर्गत जायकाकडून जो प्रोजेक्ट मंजूर झाला आहे. त्यातून नदीमध्ये सांडपाणी जाणार नाही यावरील कामे करण्यासाठी यावर्षी १३० कोटी रू.खर्च करणार आहोत. पर्वती डब्ल्यू.टी.ची कामे करण्याकरीता ७० कोटी रू., बंद नलिकेचे काम पूर्ण करणेकरीता १०० कोटी रू. वडगाव येथील १२५ एम.एल.डी.डब्ल्यू.टी.पी.पूर्ण करण्याकरीता ३० कोटी रू., स्वच्छ भारत अभियान, शौचालय व्यवस्थापनासाठी १० कोटी, ५०० मे.टन नवीन मिश्रीत कचरा प्लॅन्ट, डिसेंबर १६ पर्यंत पी.पी.पी.वर आपण पूर्ण करणार आहोत. नोबल एक्सचेंज ३०० मे.टन.लवकरच पी.पी.पी.धर्तीवर सुरू करणार आहोत. एक नवीन रूग्णालय व अस्तित्वात असलेल्या १७ रूग्णालयांमधील प्रयोगशाळा पी.पी.पी.तत्वावर सुरू करणार आहे. सध्या सुरू असलेल्या सर्व उड्डाणपूलांची कामे सन २०१६–१७ मध्ये पूर्ण करायची आहेत. त्यासाठी १५३ कोटी रू.चा निधी यावर्षी बजेट मध्ये धरण्यात आलेला आहे. उच्च दर्जाच्या ७५ कि.मी.च्या पदपथांची निर्मिती करायची आहे त्यासाठी ७५ कोटी रू.ची तरतूद करण्यात आलेली आहे. शहराचा सायकल प्लॅन तयार करून शहरात सायकलिंग इन्फ्रास्ट्रक्चर उभे करण्याकरीता २५ कोटी रू.ची तरतूद करण्यात आले. सर्व पथदिवे पी.पी.पी.तत्वावर एल.ई.डी.स्मार्ट लायटींग मध्ये परावर्तीत करायचे आहे. मनपाच्या इमारतींवर सौर उर्जा निर्मित करणे व शहराच्या इतर भागात प्रोत्साहित करणे. हे आपण बी.ओ.टी.तत्वावरच करणार आहोत. जे.एन.एन.यु.आर.एम., स्मार्टसिटी व अमृत प्रकल्पांसाठी ५०१ कोटी रू.यावर्षी खर्च होणार आहेत. नवीन ३० कि.मी.ची बी.आर.टी.ची यंत्रणा निर्माण करण्याकरीता १२५ कोटी रू., मनपाचे विस्तारीत काम पूर्ण करण्याकरीता २२ कोटी रू., घोले रोड, औंध, बिबवेवाडी, नगररोड येथे क्षेत्रिय कार्यालय बांधण्याकरीता ६ कोटी रू.,नायडू हॉस्पीटल आवारात रेकॉर्ड जतन करण्यासाठी प्रशासकीय इमारतीला ५ कोटी रू., हरिटेज व पर्यटनासाठी १५ कोटी रू., शहरात ठिकठिकाणी घनकचरा केंद्रे विकसीत करण्याकरीता १० कोटी रू., स्ट्रीट ॲबुलन्सेस, मोबाईल मेंटेनेन्स युनिटसाठी १५ कोटी रू., स्मार्ट गर्व्हनन्स आराखडा इंम्पिलिमेंटेशनसाठी ४० कोटी, नदी सुधार योजनेचा आराखडा तयार करण्याकरीता ५ कोटी रू. शास्त्रोक्त भू–भराव, लॅण्डफिल विकसीत करण्याकरीता ८ कोटी, कॅपिंगचे काम पूर्ण करण्याकरीता १० कोटी रू., स्मार्टसिटी अंतर्गत २०० कोटी रू. आणि अमृत अंतर्गत ८० कोटी रू. अशा ठळक बाबी असलेल्या ५१९९ कोटी रू.चे हे बजेट आपल्यासमोर सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. हे अंदाजपत्रक सादर करताना आपण सगळयांनी सन्माननीय मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.स्थायी समिती अध्यक्षा, मा.सभागृहनेते, मा. विरोधी पक्षनेते, सर्व मा.पक्षनेते, सर्व मा.स्थायी समितीचे सदस्य, सर्व सभासद, माझे सर्व सहकारी, अधिकारी, कर्मचारी आणि आपण सगळयांकडून मिळालेल्या बहुमोल सहकार्याबद्दल मी आपल्या सर्वांचा मन:पूर्वक आभारी आहे. धन्यवाद..

नगरसचिव–माझ्याकडे सभा तहकूबी आली आहे.

**सभा–तहकूबी**

**सूचक–**मा.बापूराव कर्णे गुरूजी **अनुमोदक–**मा.मुकारी आण्णा आलगुडे

आजची सभा दि.२८/१/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजेपर्यंत तहकूब करावी.

नगरसचिव–या तहकूबीला कोणाचा विरोध आहे का?
मा.अध्यक्षा– आजची सभा दि.२८/१/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

अशा पध्दतीने सभा समाप्त झाल्याचे मा.अध्यक्षा यांनी प्रकट केले.

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**